रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक ४१
www.ramprahar.com
रविवार, २७ ऑगस्ट २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

ग्रीन हायड्रोजन भविष्यातील इंधन -ना. हरदीप पुरी/२
'रविप्रहर'मध्ये विविध विषयांवरील लेख/४
जागतिक बॅडमिंटन स्पर्धेत प्रणॉय सेमीफायनलमध्ये/८

## देवेंद्र फडणवीसांना जेलमध्ये टाकण्याचा प्रयत्न झाला : मुख्यमंत्री



**मुंबई** : महाविकास आघाडीचे सरकार असताना गिरीश महाजन, नवनीत राणा, कंगना राणौत, नारायण राणे यांच्यावर खोटे आरोप लावण्यात आले होते. खोट्या कारवायांच्या माध्यमातून देवेंद्र फडणवीस यांनाही जेलमध्ये टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला, असा गंभीर आरोप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला आहे. ते शनिवारी (दि. २६) ठाण्यात प्रसारमाध्यमांशी बोलत होते. सत्तेचा आणि यंत्रणांचा दुरूपयोग महाविकास आघाडीचे सरकार असताना झाला. मलाही काही गोष्टी माहिती आहेत. देवेंद्र फडणवीस यांनाही गुन्ह्यात अडकवून जेलमध्ये टाकण्याचा प्रयत्न झाला, पण सीबीआयाने 'दूध का दूध, पानी का पानी' केले. सत्तेचा दुरुपयोग कोण करीत होते? आणि कोण कोणावर आरोप करतेय याचा विचार जनता करीत आहे. योग्यवेळी विरोधकांना उत्तर दिले जाईल, असा इशारा मुख्यमंत्र्यांनी या वेळी दिला.

# आता २३ ऑगस्ट राष्ट्रीय अंतराळ दिन

### चांद्रयान मोहिमेच्या यशानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदींची घोषणा

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

चांद्रयान-३ मोहिमेच्या यशस्वीतेनंतर भारताने अंतराळ क्षेत्रातही जागतिक पातळीवर दबदबा निर्माण केला आहे. इस्रो अर्थात भारतीय अवकाश संशोधन संस्थेने प्रक्षेपित केलेले चांद्रयान २३ ऑगस्ट रोजी चंद्रावर उतरले. त्यामुळे हा दिवस दरवर्षी राष्ट्रीय अंतराळ दिन म्हणून साजरा केला जाईल, अशी घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी (दि. २६) इस्रोच्या वैज्ञानिकांशी संवाद साधताना केली. या वेळी पंतप्रधान मोदी भावूक झाल्याचे पहायला मिळाले.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, भारताची युवा पिढी तंत्रज्ञान, विज्ञानाने भारलेली आहे. त्यामागे आपल्या अशाच स्पेस मिशनचे यश आहे. मंगलायानचे यश, चांद्रयान मोहिमेचे यश, गगनयानामुळे देशाच्या युवा पिढीला नवा उत्साह मिळाला आहे. प्रत्येकाच्या तोंडी आज चांद्रयानाचे नाव आहे. भारतातील प्रत्येक लहान मूल वैज्ञानिकांमध्ये आपले भविष्य पाहत आहे. त्यामुळे वैज्ञानिकांनी फक्त चंद्रावर तिरंगा फडकवला नसून एक मोठे यश प्राप्त केले आहे, ज्यामुळे भारताच्या संपूर्ण पिढीला नवी ऊर्जा मिळाली आहे. तुम्ही पूर्ण पिढीवर आपल्या यशाचा ठसा उमटवला आहे. भारतीय मुलांमध्ये आकांक्षाचे बीज रोवले आहे, जे उद्या वटवृक्ष बनेल.



### 'त्या' पॉईंट्सचे शिवशक्ती, तिरंगा नामकरण



भारताचे चांद्रयान-३ हे चंद्राच्या ज्या जागेवर उतरले ती जागा शिवशक्ती या नावाने ओळखली जाईल, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या वेळी जाहीर केले. शिवमध्ये मानवतेच्या कल्याणाचा संकल्प आहे आणि शक्तीपासून त्या संकल्पांना पूर्ण करण्यासाठी सामर्थ्य मिळते. चंद्रावरील शिवशक्ती पॉईंट हिमालयापासून ते कन्याकुमारी जोडल्याचा बोध करीत आहे, असे ते म्हणाले. याशिवाय चार वर्षांपूर्वी चांद्रयान-२ने जिथे आपली पावले ठेवली आहेत ती जागा आता तिरंगा या नावाने ओळखली जाणार आहे. हा तिरंगा पॉईंट आपल्याला शिकवण देईल की, कोणतेही अपयश शेवटचे नसते. जर दृढ इच्छाशक्ती असेल, तर यश प्राप्त होतेच, असे पंतप्रधान मोदींनी अधोरेखित केले.

# पनवेल ते इंदापूर सिंगल लेन वाहतूक १० सप्टेंबरपासून सुरू करणार

### मंत्री रवींद्र चव्हाण यांची ग्वाही; मुंबई-गोवा महामार्गाची पाहणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुंबई-गोवा महामार्गावरील पनवेल ते कासू आणि कासू ते इंदापूर या दोन टप्प्यांतील ८४ किलोमीटरचा रस्ता पूर्ण क्षमतेने तयार करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. यासाठी नवीन अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा व मशिनरीचा वापर होत आहे. त्यामुळे काम वेगाने पूर्ण होत असून १० सप्टेंबरपासून ही लेन वाहतुकीस पूर्ण क्षमतेने सुरू होईल, असा विश्वास राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांनी व्यक्त केला आहे.

मंत्री रवींद्र चव्हाण यांनी शनिवारी (दि. २६) मुंबई-गोवा महामार्गाच्या कामाची पाहणी केली. या दौऱ्यात त्यांनी पनवेल ते नागोठणे वाकण फाट्यापर्यंतच्या कामाची पाहणी केली. पहिल्या टप्प्यातील पळस्पे फाटा तसेच जिते, तर कासू ते इंदापूर या दुसऱ्या टप्प्यातील पांडापूर व नागोठणे येथील कामाची त्यांनी पाहणी केली. महामार्गाच्या कामासाठी अत्याधुनिक मशिनरी मागवण्यात आल्या आहेत, त्याची सविस्तर माहिती मंत्री चव्हाण यांनी उपस्थित अधिकाऱ्यांकडून घेतली. पाहणी दौऱ्याच्या निमित्ताने पांडापूर व नागोठणे येथे त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला.



मंत्री रवींद्र चव्हाण म्हणाले, मुंबई-गोवा महामार्गावरील कासूपासून पुढील कामाची गती वाढविण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनएचएआय)चे अधिकारी व ठेकेदारांना आदेश दिले आहेत. या टप्प्यातील सात किमीचा रस्ता थोडा किचकट आहे. त्यामुळे स्थिती पाहून नवीन तंत्राचा वापर केला जात आहे. खोलवर सिमेंट काँक्रीटचा वापर व अवजड वाहतुकीमुळे रस्ता खराब होऊ नये यासाठी २० टनी रोलरचा वापर केला जाणार आहे. यासोबतच आधुनिक मशीन उपलब्ध करण्यात आली असून पांडापूर येथे त्याची पाहणी केली. **(पान २ वर..)**

# भाजप जिल्हा कार्यालयाचे उद्या भूमिपूजन आणि पनवेल येथील मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन

### मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते होणार शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाच्या नव्याने उभारण्यात येणाऱ्या उत्तर रायगड जिल्हा कार्यालयाचे भूमिपूजन तसेच नूतनीकरण केलेल्या पनवेल मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन सोमवारी (दि. २८) राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली व आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

उत्तर रायगड जिल्हा भाजपचे कार्यालय पनवेल तालुक्यातील डेरवली येथे उभारण्यात येणार असून त्याचे भूमिपूजन सकाळी ९.३० वाजता करण्यात येणार आहे, तर पनवेल शहरात रूपाली सिनेमागृहाजवळ असलेल्या मध्यवर्ती कार्यालयाचे नूतनीकरण करण्यात आले असून त्याचे उद्घाटन सकाळी १०.३० वाजता होणार आहे.

या कार्यक्रमास पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन



भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल तालुका मंडल अध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर मंडल अध्यक्ष जयंत पगडे, कामोठे मंडल अध्यक्ष रवींद्र जोशी, कळंबोली मंडल अध्यक्ष रविनाथ पाटील, खारघर मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल, उरण मंडल अध्यक्ष रवी भोईर, खालापूर मंडल अध्यक्ष रामदास ठोंबरे, कर्जत मंडल अध्यक्ष मंगेश म्हसकर, खोपोली मंडल अध्यक्ष रमेश रेटरेकर यांनी केले आहे.

## निवडक

### मदुराईत ट्रेनला आग; नऊ प्रवाशांचा मृत्यू

**मदुराई** : लखनऊहून रामेश्वरमला निघालेल्या एका खासगी टूरिस्ट ट्रेनच्या डब्याला भीषण आग लागल्याची घटना शनिवारी (दि. २६) पहाटे मदुराई रेल्वेस्थानकाजवळ घडली. या आगीत नऊ जणांचा मृत्यू झाला आहे. काही प्रवाशांनी नेलेल्या गॅस सिलिंडर्समुळे आगीचा भडका उडाल्याचा प्राथमिक अंदाज असून अधिक तपास सुरू आहे.

### चंद्रावरील रहस्यांच्या शोधासाठी प्रज्ञान रोव्हरचा प्रवास सुरू

**नवी दिल्ली** : चांद्रयान-३च्या लँडरमधून प्रज्ञान रोव्हर बाहेर पडले असून ते आता चंद्रावर फिरत आहे. लँडरमधील कॅमेऱ्यात रोव्हरचा प्रवास कैद झाला आहे. 'इस्रो'ने हा व्हिडीओ आपल्या अधिकृत ट्वीटर हँडलवर शेअर करीत माहिती दिली.

## चोरीच्या संशयावरून दलित तरुणांना झाडाला उलटे टांगून अमानुष मारहाण

### अहमदनगरमधील धक्कादायक प्रकार

**अहमदनगर : प्रतिनिधी**

शेळी आणि कबुतरे चोरल्याच्या संशयावरून श्रीरामपूर तालुक्यातील हरेगाव येथे तीन दलित तरुणांना झाडाला बांधून मारहाण केल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली असून दोषींवर कडक कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

हरेगाव येथे मोलमजुरी करणाऱ्या तीन दलित तरुणांच्या बाबतीत ही घटना घडली आहे. शेजारी उंदीरगाव येथील गलांडे वस्तीवरील शेळी आणि चार कबुतरे या तरुणांनी चोरल्याचा संशय होता. त्यावरून या तीन तरुणांना कपडे काढून झाडाला उलटे टांगले गेले आणि चोरीसंबंधी विचारणा करून अमानुष मारहाण करण्यात आली.

या मारहाणीत शुभम वाघाडे, कुणाल मगर, ओम गायकवाड हे तरुण गंभीर जखमी झाले असून त्यांना कामगार हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

या प्रकरणी संबंधितांचे जबाब नोंदविण्यात आले असून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## कार अपघातात तीन जण ठार

**सातारा : प्रतिनिधी**


पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावर सातारा शहराच्या हद्दीत शनिवारी (दि. २६) झालेल्या भीषण अपघातात एकाच कुटुंबातील तीन जणांचा मृत्यू झाला. नवी मुंबईहून जयसिंगपूरकडे निघालेल्या तवेरा गाडीचा टायर अचानक फुटला व ती समोरून येणाऱ्या बोलेरो पिकअपला धडकली. यात तवेरा गाडीतील तिघा प्रवाशांना प्राण गमवावे लागले.

मृतांमध्ये निखिल श्रीकांत सवाखंडे (वय ३०), प्रियांका निखिल सवाखंडे (वय ३२), शशिकांत यदुनाथ सवाखंडे (वय ६३) यांचा समावेश आहे. जखमींवर उपचार सुरू आहेत.



**पनवेल : दक्षिण कोरियात झालेल्या जागतिक तायक्वांडो स्पर्धेत पनवेल तालुक्यातील वरचे ओवळे येथील अक्षता अंकुश भगत आणि मयुरेश राम घरत यांनी सुवर्णपदक पटकाविले आहे. या दोघांनी शनिवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांचे अभिनंदन व कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष राकेश गायकवाड, तालुका उपाध्यक्ष संदीप घरत, राम घरत, अंकुश भगत, धनराज घरत आदी उपस्थित होते.**



भारतीय जनता पार्टी
उत्तर रायगड जिल्हा
सस्नेह निमंत्रण

नव्याने उभारण्यात येणाऱ्या जिल्हा कार्यालयाचे भूमीपुजन तसेच नुतनीकरण केलेल्या **पनवेल मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन** सोमवार दि. 28 ऑगस्ट 2023 रोजी महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री **मा. ना. रविंद्रजी चव्हाण साहेब** यांच्या शुभहस्ते व **माजी खासदार लोकनेते मा. श्री. रामशेठजी ठाकूर साहेब** यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. **मा. आमदार श्री. प्रशांतजी ठाकूर, मा. आमदार श्री. महेशजी बालदी** यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणाऱ्या या कार्यक्रमास आपण आपल्या सहकाऱ्यांसह उपस्थित रहावे.

भूमीपुजन समारंभ : सकाळी 09.30 वाजता
ठिकाण :- डेरवली, ता. पनवेल, जि. रायगड
उद्घाटन समारंभ : सकाळी 10.30 वाजता
ठिकाण : ॲस्पायर प्राईड, रुपाली सिनेमासमोर, पनवेल शहर

निमंत्रक

अविनाश कोळी (अध्यक्ष, उत्तर रायगड जिल्हा)
अरुणशेठ भगत (अध्यक्ष, पनवेल ग्रामीण मंडल)
जयंत पगडे (अध्यक्ष, पनवेल शहर मंडल)
रवींद्र जोशी (अध्यक्ष, कामोठे मंडल)
रविनाथ पाटील (अध्यक्ष, कळंबोली मंडल)
ब्रिजेश पटेल (अध्यक्ष, खारघर मंडल)
रवी भोईर (अध्यक्ष, उरण मंडल)
रमेश रेटरेकर (अध्यक्ष, खोपोली मंडल)
मंगेश म्हसकर (अध्यक्ष, कर्जत मंडल)
रामदास ठोंबरे (अध्यक्ष, खालापूर मंडल)

# नाना पटोलेंना गांभीर्याने घेत नाही!

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे खास शैलीत प्रत्युत्तर

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जपान दौर्‍यावर गेल्यानंतर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी राज्यात दुष्काळसदृष्य स्थिती असताना नेते जपान दौर्‍यावर जात आहेत, अशी टीका केली. यानंतर आता देवेंद्र फडणवीस शनिवारी (दि. २६) जपानहून मुंबईत परतले आणि मुंबईत आल्यानंतर पत्रकारांनी त्यांना नाना पटोलेंच्या टीकेबाबत विचार केली. त्यावर फडणवीसांनी प्रत्युत्तर दिले.



उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, नाना पटोलेंना मी कधीच गांभीर्याने घेतलेले नाही. ते सकाळी वेगळे बोलतात, संध्याकाळी वेगळे बोलतात, दुसर्‍या दिवशी अजून वेगळे बोलतात. मी जपानला गेलो, तर भारतासाठी, मुंबईसाठी काही तरी घेऊन आलो. मी फिरायला गेलो नव्हतो.

नाना पटोले महाराष्ट्रभर कशासाठी फिरतात आणि काय करतात मला माहिती नाही, मात्र, ते माझे मित्र आहेत. त्यामुळे ते असे बोलले असले तरी मी त्यांना माफ करतो, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.

ते पुढे म्हणाले, काँग्रेस काय म्हणते यावर मी बोलणार नाही, कारण तो नैराश्य आलेला पक्ष आहे. त्यांनी खूप आधीच देशाविषयी विचार करणे थांबवले आहे.

संपूर्ण देशाला माहिती आहे की, पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात आपण प्रगती करीत आहोत. चांद्रयान ३ चंद्रावर उतरत होते त्या दिवशीही मोदी दक्षिण अफ्रिकेतून याबाबत क्षणोक्षणीची माहिती घेत होते.

**विरोधी पक्ष अत्यंत खालच्या स्तरावरील राजकारण करतोय**

**आपल्या शास्त्रज्ञांनी चांगले काम केले असेल, तर त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी, शुभेच्छा देण्यासाठी पंतप्रधान जाणार नाही मग इतर कोण जाईल. विरोधी पक्ष अत्यंत खालच्या स्तरावरील राजकारण करीत आहे. देशाला यश मिळते तेही त्यांना बघवत नाही. विरोधी पक्षाची यापेक्षा वाईट स्थिती मी आतापर्यंत कधी पाहिलेली नाही, असे म्हणत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या वेळी काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल केला.**

# रायगड जिल्ह्यातील ७३५ अंगणवाड्यांना इमारतींची प्रतीक्षा

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील अंगणवाड्यांच्या इमारतींचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. अनेक इमारती नादुरूस्त झाल्या असून अनेक ठिकाणी गळक्या छपराखालीच चिमुरड्यांना शिक्षण घ्यावे लागत आहे, तर जिल्ह्यातील ७३५ अंगणवाड्यांना स्वतंत्र इमारतच नसल्याची बाब समोर आली आहे.

ग्रामीण भागातील चिमुकल्यांना शाळेची गोडी लागावी यासाठी अंगणवाडीची संकल्पना राबवली जाते. जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागांतर्गत अंगणवाड्या चालवल्या जातात. ग्रामीण भागातील लहान मुलांना शाळेची गोडी लागावी तसेच कुपोषणमुक्तीसाठी अंगणवाड्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरली आहे. जिल्ह्यात तीन हजारहून अधिक मोठ्या, मिनी अंगणवाड्या आहेत. मोठ्या अंगणवाड्यांमध्ये अंगणवाडी सेविका व मदतनीस असे दोन कर्मचारी, तर मिनी अंगणवाडीत एक कर्मचारी कार्यरत आहेत.

गावाच्या लोकसंख्येनुसार अंगणवाड्यांची मंजुरी दिली जाते. ज्या गावांमध्ये अंगणवाड्या मंजूर झाल्या तिथे इमारतीची अडचण होती. प्रशासनाचा पाठपुरावा, गावकर्‍यांचे सहकार्य आणि सरकारकडून दिला जाणारा निधी यामुळे जिल्ह्यात ७५ टक्केहून अधिक अंगणवाड्यांची स्वतःची इमारत आहे.

जिल्ह्यात तीन हजार ९८ लहान-मोठ्या अंगणवाड्या असल्याची नोंद जिल्हा परीषदेकडे आहे. त्याचा दीड लाखांच्या आसपास बालके लाभ घेतात, परंतु अद्यापही ७३५ अंगणवाड्यांना स्वतःची इमारत नाही. जेथे स्वतःची इमारत नाही तेथे चावडी, समाजमंदिर, मंदिर अशा सार्वजनिक जागा किंवा प्राथमिक शाळांच्या इमारतींमध्ये अंगणवाडी भरवली जाते, तर जिथे यापैकी काहीच उपलब्ध नसेल तेथे भाड्याच्या जागेत अंगणवाडी चालवली जाते. एक अंगणवाडी बांधण्यासाठी सहा लाखांचे बजेट अपेक्षित धरण्यात आले आहे. दरवर्षी सरकारकडून निधी मिळत नसल्याने झेडपी महिला व बालकल्याण विभाग जिल्हा नियोजन समितीकडे निधीची मागणी करत असते. या वर्षीदेखील अंगणवाडीच्या नवीन इमारतींसाठी नियोजन समितीकडे मागणी करण्यात आली आहे.

**गळक्या, नादुरूस्त इमारती**

**जिल्ह्यात दोन हजार ३६३ अंगणवाडी इमारती असल्या तरी यातील अनेक इमारती नादुरूस्त असल्याने धोकादायक बनल्या आहेत, तर काही अंगणवाड्यांच्या छपरांना गळती लागली आहे. अशा गळक्या आणि पडक्या इमारतींमध्ये मुले धोकादायक स्थितीत बागडताना पहायला मिळतात. अंगणवाडीतील बालकांना आहारही दिला जातो, पण गळक्या इमारतींमुळे पावसाळ्यात तो भिजून वाया जाण्याची भीती असते.**

**जिल्ह्यातील सर्व अंगणवाड्यांना स्वतंत्र इमारती असाव्यात यासाठी प्रशासनाचा प्रयत्न आहे. जिल्हा नियोजन समितीकडे नवीन अंगणवाडी इमारतींसाठी प्रस्ताव पाठवण्यात आले होते. त्यांना मंजुरी मिळाली असून लवकरच त्यासाठीचा निधी उपलब्ध होईल.**

**-निर्मला कुचिक,**
**महिला बालकल्याण अधिकारी**
**रायगड जिल्हा परिषद**

**अंगणवाड्याची सद्यस्थिती**

**एकूण : ३ हजार ९८**
**स्वतःच्या जागेत : २ हजार ३६३**
**सार्वजनिक जागेत : २४७**
**प्राथमिक शाळेत : २१९**
**भाड्याच्या जागेत : २६९**

## महाडमध्ये दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर न्यायालयाचे उद्घाटन

**महाड : प्रतिनिधी**

महाडमध्ये शनिवारी (दि. २६) दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर न्यायालयाचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती रियाज छागला यांच्या हस्ते झाले. या वेळी त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणामध्ये महाडमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक क्रांती केलेली आहे. अशा महाडमध्ये दिवाणी न्यायाधीश उच्च स्तर न्यायालय होत असल्याचा आनंद आहे. जर आपल्याकडे सक्रिय न्यायव्यवस्था असेल, तर त्याचा फायदा लोकांना होईल आणि भविष्यात नक्कीच न्याय मिळेल, अशी खात्री व्यक्त केली.



या कार्यक्रमास न्यायमूर्ती मिलिंद साठ्ये, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अजय राजंदेकर, दिवाणी न्यायाधीश महाड उपस्थित होते. महाड मधील न्यायालयाला भेट दिल्यानंतर महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे झालेल्या उद्घाटन सोहळ्यात उपस्थित न्यायमूर्तींचे स्वागत महाड बार असोसिएशन तसेच विविध तालुका बार असोसिएशनच्या वतीने करण्यात आले.

प्रास्ताविकापर भाषणात जिल्हा सत्र न्यायालयाचे न्यायाधीश अजय राजेंदेकर यांनी यांनी पक्षकारांना जलद गतीने न्याय मिळावा या हेतूने या न्यायालय सुरू केले जात असल्याचे स्पष्ट केले. रायगड जिल्ह्याची भौगोलिक स्थिती पाहता पोलादपूरसारख्या टोकाच्या तालुक्यातून पक्षकारांना अलिबागमध्ये जाणे खर्चिक आणि वेळ वाया घालवणारे होते ही बाब लक्षात घेऊन हे न्यायालय सुरू झाले.

# ग्रीन हायड्रोजन भविष्यातील इंधन

## केंद्रीय मंत्री हरदीप पुरी यांचे कॉन्क्लेवमध्ये प्रतिपादन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतात इंधनाचा वापर जगातील इतर देशांच्या तुलनेत तिप्पट आहे. आज तुम्हाला इंधनाच्या वापरातून अर्थव्यवस्थेच्या विकासाची कल्पना येऊ शकते. ग्रीन हायड्रोजन हे भविष्यातील इंधन आहे, असे केंद्रीय मंत्री हरदीप पुरी यांनी म्हटले आहे. एनडीटीव्ही कॉन्क्लेवमध्ये ते बोलत होते.

केंद्रीय मंत्री हरदीप पुरी म्हणाले की, आज तुम्हाला इंधनाच्या वापरातून अर्थव्यवस्थेच्या विकासाची कल्पना येऊ शकते. ग्रीन हायड्रोजन हे भविष्यातील इंधन आहे. आज नाही, तर उद्या ग्रीन फ्युएल फॉसिल फ्युएलच्या किमतीत मिळेल आणि हे लवकरच होईल.

भारताने दहाव्या सर्वांत मोठ्या अर्थव्यवस्थेपासून पाचव्या क्रमांकाच्या अर्थव्यवस्थेचा प्रवास केला आहे. भविष्यात भारत १० ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनू शकेल याबद्दल कोणालाही शंका नाही, असे सांगून पुरी यांनी बोलताना मॉर्गन स्टॅन्ले यांच्या वक्तव्याचादेखील दाखला दिला. ते म्हणाले की, मॉर्गन स्टॅन्ले यांचे म्हणणे आहे की, भारताचे भविष्य हे चीनच्या भूतकाळासारखे असेल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०२१मध्ये लाल किल्ल्यावरून केलेल्या भाषणात ग्रीन हायड्रोजनचा अवलंब करण्याबाबत सांगितले तेव्हा अनेकांनी त्यावर प्रश्न उपस्थित केले. लाल किल्ल्यावरून केलेल्या भाषणात ज्या वेळी पंतप्रधान असे मोठे वक्तव्य करतात त्या वेळी नक्कीच काहीतरी अर्थ असतो, असेही पुरी म्हणाले.

# उरण नगर परिषद क्षेत्रात स्वच्छता अभियान

**उरण : वार्ताहर**

उरण शहरांमध्ये फक्त सुशोभिकरणच नव्हे तर सातत्याने स्वच्छताही आवश्यक आहे. प्रशासनाने शहरांच्या स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी दिले आहेत. त्यानुसार जिल्ह्यातील विविध नगरपालिका क्षेत्रात स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आले. मागील महिन्याप्रमाणे उरण शहरातही स्वच्छता अभियान राबविण्यात आले




या अभियानात उरण शहरातील तहसील कार्यालय परिसर ते मशीद मोहल्ला ते महात्मा गांधी पुतळा ते वाणी आळी. अभियानात एकूण ४टन कचरा उचलण्यात आला. या अभियान तहसीलदार उद्धव कदम तसेच उरण नगर परिषदेचे मुख्याधिकारी राहुल इंगळे, लेखापाल सुरेश पोसतांडेल, नगररचनाकार सचिन भानुसे, बांधकाम अभियंता झुंबर माने, माजी नगराध्यक्ष सायली म्हात्रे, माजी नगरसेवक कौशिक शाह, प्रसाद मांडेलकर यांच्या श्रमदानातून पार पडले.

उरण नगर परिषद शाळा क्र १,२,३ चे शिक्षक तसेच विद्यार्थी, माय नॉलेजचे विद्यार्थी यांनी या अभियानात भाग घेऊन श्रमदान केले. स्वच्छता अभियानामुळे उरण शहर स्वच्छ होण्यास नक्की मदत होईल.

पान १ वरुन

## पनवेल ते इंदापूर सिंगल लेन वाहतूक १० सप्टेंबरपासून सुरू करणार

कासूपासून पुढील सात किमी व नंतर ३.५ किमी अंतराच्या कामासाठी आर्म टॉपिंग पद्धतीचा वापर होईल. या फेजमध्ये पळस, वाकण फाटा, जिंदाल गेट, कोलाड, इंदापूर या भागात विविध अंतरानुसार कामाची विभागणी केली आहे, तर इंदापूरजवळचा टप्पा पूर्ण करताना १६ किमी अंतरासाठी व्हाईट टॉपिंग तंत्राचा वापर केला जाईल, असे मंत्री चव्हाण यांनी सांगितले. यासाठी नियुक्त अधिकारी व यंत्रणेच्या कामाचाही त्यांनी आढावा घेतला.

महामार्गाची कामे तातडीने होण्यासाठी व वाहतुकीचा अडथळा येऊ नये यासाठी पोलीस विभागाचे सहाय्य घेण्याबाबत मंत्रीमहोदयांनी सूचना दिल्या. याबाबत त्यांनी पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्याशी चर्चा केली. हा मार्ग लवकरात लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने युद्धपातळीवर प्रयत्न करण्याचे निर्देशही त्यांनी अधिकार्‍यांना दिले.

मुंबई-गोवा महामार्गाचे रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बहुतांश काम जवळजवळ पूर्ण झाले आहे. कोकणातील जनतेच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा असणार्‍या हा महामार्गाची एक लेन गणेशोत्सवापूर्वी वाहतुकीसाठी पूर्ण करण्यात येईल आणि नऊ मीटर रुंदीच्या दोन्ही लेन डिसेंबरपर्यंत पूर्ण करणार आहोत, असे ना. चव्हाण यांनी सांगितले.

या पाहणी दौर्‍यात मंत्रीमहोदयांसमवेत भाजपचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष व माजी आमदार धैर्यशील पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस दीपक बेहेरे, नितीन पाटील, पनवेल शहर सरचिटणीस अमरिश मोकल, एनएचएआयचे मुख्य अभियंता संतोष शेलार, प्रकल्प अभियंता यशवंत घोटेकर, कार्यकारी अभियंता निरज चोरे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी होते.

**वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी घेतला पुढाकार**

राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांचा मुंबई-गोवा महामार्ग पाहणी दौरा सुरू असतानाच पेणजवळ हॉटेल साई सहारा येथे एक एसटी बंद पडल्यामुळे या मार्गावर सुमारे दोन ते अडीच तास वाहतूक कोंडी झाली होती. एसटी जागेवरच बंद पडल्याने दोन्ही बाजूच्या मार्गिकेवरील गाड्या तब्बल दोन तास अडकल्या होत्या. त्यामुळे जिते गावाच्या पुलापासून हॉटेल साई सहारा व तेथून पेणकडे जाणार्‍या महामार्गाच्या दोन्ही लेनवर वाहनांच्या रांगा दूरवर वाढून वाहतूक कोंडीत भर पडत होती. बंद एसटी बस जागेवरून काढण्याचे प्रयत्न सुरू होते. अखेर सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण स्वतः रस्त्यावर उतरले व चालत हॉटल साई सहारापर्यंत गेले. त्यांनी व त्यांच्या सहकार्‍यांनी या वाहतूक कोंडीतून मार्ग काढत बंद एसटी क्रेनच्या साह्याने बाजूला केली. सुमारे दोन तासानंतर हे यश आले व त्यामुळे या मार्गावरील वाहतूक सुरळीत झाली. त्यानंतर महामार्गावरील प्रवाशांनी सुटकेचा निःश्वास टाकला.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयाचा आर्थिक विकास मंडळ परिषदेत सहभाग



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयाने महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळाने दादर येथे आयोजित केलेल्या लघू, सूक्ष्म व मध्यम व्यवसायासाठी चालना देण्यासाठी आयोजित केलेल्या परिषदेमध्ये सहभाग घेतला.

भारत सरकार व महाराष्ट्र शासन नेहमी लघु, सूक्ष्म व मध्यम व्यवसायासाठी जालना देत असतं त्याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळाने दादर येथे लघू सूक्ष्म व मध्यम व्यवसायाला व व्यावसायिकाला चालना देण्यासाठी या परिषदेचे गुरुवारी (दि. २४) आयोजन केले होते. त्यामध्ये भारतातील व भारताबाहेरी वेगवेगळे व्यवसायिक तसेच रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयातील सुमारे १२ विद्यार्थी व पाच प्राध्यापकांनी या परिषदेमध्ये सहभाग घेतला तसेच वेगवेगळ्या व्यवसायकांशी चर्चा केली व वेगवेगळ्या व्यवसायाबद्दल तसेच भविष्यामध्ये एक व्यवसायिक म्हणून कशी वाटचाल केली पाहिजे याविषयी मोलाचे मार्गदर्शन घेतले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी या परिषदेसाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले व शुभेच्छा दिल्या.

# रिले गावात शेतकर्‍यांसाठी मार्गदर्शनपर कृषीशाळा

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील देगाव ग्रामपंचायत हद्दीतील रिले गावात नुकतेच शाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कृषी शाळेत उपस्थित शेतकर्‍यांना कृषी अधिकार्‍यांनी मौलिक असे मार्गदर्शन केले.



शेतकर्‍यांना विविध योजनांबद्दल माहिती तसेच खास करून पीएम किसान योजना अंतर्गत सर्व माहिती तसेच गोपीनाथ मुंडे अपघात विमा, भात शेती याबाबत कृषी अधिकारी एस. आर. नलावडे व विभागीय कृषी अधिकारी एन. आर. ठाकरे यांनी उपस्थित राहून शेतकरी बांधवांना मार्गदर्शन करून शेतकरी बांधवांना तुरीच्या बियाणांचे वाटप केले. या कार्यक्रमात ग्रामस्थांच्या वतीने गावचे अध्यक्ष तुलाजी दिवेकर, कमलाकर चव्हाण, नितीन वाघमारे यांनी उपस्थित अधिकार्‍यांचे स्वागत केले.

# काळेश्री अक्कादेवी येथे खरे महाराजांची पुण्यतिथी

**पेण :** काळेश्री येथे सद्गुरू खरे महाराज यांची २५वी पुण्यतिथी गुरुवारी (दि. २४) साजरी करण्यात आली. या निमित्त कुणाल ठाकूर (दिव) यांच्या पौरोहित्याखाली सद्गुरु खरे महाराज व देवी आकादेवीला अभिषेक घातला गेला.

खरे महाराज यांच्या २५ व्य पुण्यतिथीनिमित्त आमदार रविशेठ पाटील यांनी काळेश्री येथे जाऊन कीर्तनाचा लाभ घेतला. रविशेठ पाटील हे खरे महाराज मंडळाचे २५ वर्षे अध्यक्ष आहेत. त्यांचा सत्कार मंडळाचे उपाध्यक्ष माजी सभापती व्ही.बी. पाटील व बाबुराव म्हात्रे यांच्या हस्ते शाळव श्रीफळ देऊन करण्यात आला. या वेळी भोजन व्यवस्था बळीराम बापू पाटील (दिवपाडा) यांच्यावतीने करण्यात आली होती. या कार्यक्रमास भाविक, भक्त गणांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली.



## दुखवटा

### साजन सरकार

**मोहोपाडा :** संगीत वाद्य क्षेत्रातील एक कलाकार, खालापूर तालुक्यात सर्पमित्र म्हणून ख्याती मिळविलेल्या साजन सरकार या सर्पमित्राचे निधन झाले. कै. साजन सरकार खोपोली शहरातील काजूवाडी भागात सर्वसामान्य कुटुंबात राहणारा तसेच सर्वांना आपलासा वाटणारा आणि प्रामुख्याने प्राणीमात्रांवर जीवापाड प्रेम करणारा एक धाडसी युवक म्हणून तो संपूर्ण परिसरात प्रख्यात होता. अतिशय चपळ, उत्साही, बलदंड शरीरसृष्टी असणारा साजन नेहमीच हसतमुख राहत सर्पमित्र म्हणून वावरत असे. तो अपघातग्रस्त सामाजिक संघटनेत नेहमीच अग्रेसर असायचा.




### हिराबाई कमाने

**रेवदंडा :** बोर्ली येथील कै. हिराबाई जनार्दन कमाने यांचे रविवारी (दि. २०) निधन झाले. बोर्ली नाक्यावर प्रसिध्द असलेले कमाने बंधूचे साई प्रसाद हॉटेलचे जनार्दन कमाने यांच्या पत्नी व बोर्ली ग्रामपंचायत माजी सरपंच मंगेश कमाने यांच्या मातोश्री कै. हिराबाई जनार्दन कमाने यांचे मृत्यूसमयी वय ६६ वर्षे होते. त्यांच्या पश्चात त्याचे पती, दोन मुले, एक मुलगी, सहा नातवंडे असा परिवार आहे. कै. हिराबाई यांचा कार्यविधी बोर्ली येथील घरी होणार असून दशपिंड मंगळवारी (दि.२९) सकाळी ९ वाजता तसेच बारावा/तेरावा शुक्रवारी (दि. १ सप्टेंबर) होणार आहे.



### छगनलाल हिंगड-ओसवाल

**कर्जत :** कर्जत तालुक्यातील कशेळेया ग्रामीण भागातील कोठींबे येथे व्यवसाय करून संपूर्ण परिसरात छगनशेठ या नावाने परिचित असलेले छगनलाल दीपचंद्र हींगड तथा ओसवाल यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. मागील काही वर्षांपासून कर्जत येथे निवास करणारे छगनलाल यांच्या पश्चात मोठा परिवार आहे.



## निवडक

### कारच्या धडकेत एकाचा मृत्यू

**पनवेल :** आदई येथील पुलाखाली मुंबई-पुणे महामार्गावर ४५ ते ५० वर्षीय व्यक्तीला कारने धडक दिल्याने अपघातात त्याचा जागीच मृत्यू झाला आहे. आदई पुलाखालून एक व्यक्ती पादचाऱ्यांना परवानगी नसलेल्या मुंबई-पुणे महामार्गावरून नवीन पनवेलच्या दिशेने पायी जात होता. सकाळच्या सुमारास मुंबई-पुणे महामार्गावर मुंबई लेनवर कारने पायी जाणाऱ्या व्यक्तीला ठोकर मारली. यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. या अपघातानंतर कारचालक स्वतःहून खांदेश्वर पोलीस ठाण्यात हजर झाला. त्याने अपघाताची माहिती खांदेश्वर पोलिसांना दिली. याप्रकरणी खांदेश्वर पोलीस अधिक तपास करत आहेत.

### पनवेलमध्ये 'शासन दिव्यांगाच्या दारी'

**पनवेल :** महाराष्ट्र शासनाने जारी केलेल्या शासन आपल्या दारी या उपक्रमाच्या माध्यमातून महाराष्ट्रभर सर्व जिल्ह्यांमध्ये हा कार्यक्रम राबवण्याचे निर्देश देण्यात आले आहे. याच माध्यमातून रायगड जिल्ह्यातील दिव्यांग कल्याण विभागाच्या वतीने शासन दिव्यांगांच्या दारी हा कार्यक्रम येत्या मंगळवारी म्हणजेच २९ ऑगस्ट २०२३ रोजी सकाळी १० वाजता पनवेलमधील विरुपाक्ष मंगल कार्यालय येथे आयोजित करण्यात आला असून या कार्यक्रमादरम्यान दिव्यांगाच्या समस्या चे निवारण तसेच दिव्यांगांची शासन नोंदणी करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला मंत्री ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू व इतर मान्यवर उपस्थितीत राहणार असून दिव्यांगाने याचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन दिव्यांग कल्याण विभाग रायगडच्या वतीने करण्यात आले आहे.

# पनवेलमध्ये रस्ते सुरक्षा अभियान

## विद्यार्थी, पालकांना हेल्मेटचे वाटप

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील आजिवली येथील जनता विद्यामंदिर व न्यू मॉडेल इंग्लिश स्कूल येथे रस्ते सुरक्षा अभियान २०२३ अंतर्गत सेवा सहयोग फाउंडेशन व आयसीआयसीआय लोबार्ड जनरल इन्शुरन्स यांच्या वतीने दुचाकीस्वारांना मोफत हेल्मेटचे वाटप करण्यात आले आहे.



महामार्ग पोलीस केंद्र पळस्पे हद्दीतील जनता विद्यामंदिर अजिवली व न्यू मॉडेल इंग्लिश स्कूल अजिवली या ठिकाणी मुंबई महाराष्ट्र राज्य अप्पर पोलीस महासंचालक रवींद्र सिंगल यांच्या संकल्पनेने महामार्ग पोलीस रायगड परिक्षेत्र पोलीस अधीक्षक तानाजी चिखले, पोलीस उप अधीक्षक महामार्ग पोलीस रायगड विभाग घनश्याम पालंगे तसेच महामार्ग पोलीस पनवेल विभाग गौरी मोरे यांचे मागदर्शनाखाली महामार्गावर होणारे अपघात त्याचे कारणे व परिणाम तसेच सदर अपघात कमी करण्यासाठी घ्यावयाची दक्षता त्याअनुषंगाने रस्ते सुरक्षा अभियान २०२३ अंतर्गत सेवा सहयोग फाउंडेशन व आय सी आय सी आय लोबार्ड जनरल इन्शुरन्स यांच्या वतीने विद्यालयात मोफत हेल्मेट वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आलेला आहे.

या वेळी महामार्ग पोलीस केंद्र पळस्पेचे प्रभारी अधिकारी गणेश बुरकुल, स्कूल कमिटी चेअरमन राजेंद्र पाटील, सेवा सहयोग फाउंडेशन चे प्रोजेक्ट मॅनेजर संदेश घरत, शुषमा शिंदे, जयश्री सानप, लक्ष्मी माळी. धनंजय, विद्यालयाचे प्राचार्य डी. बी. चवरे, श्री. ससाणे, श्री. भगत व पालक, विद्यार्थी आणि उपस्थित होते.

**उपस्थितांकडून जनजागृतीसह प्रबोधन**

या कार्यक्रमांमध्ये उपस्थित मान्यवरांनी मोटरसायकल चालवताना नेहमी हेल्मेटचा वापर करावा, मोटरसायकल चालवणाऱ्या व्यक्तीने व तसेच मागे बसणाऱ्या व्यक्तीने हेल्मेटचा वापर करावा, मोटरसायकल चालवताना ट्रिपल सीट चा वापर करू नये, मोटरसायकल चालविताना धोकादायकरित्या वाहन चालवू नये, मोटरसायकल चालविताना मोबाईलवर संभाषण करू नये, मोटरसायकल चालविताना कोणत्याही प्रकारचे मद्य प्राशन करून वाहन चालवू नये, मोटर सायकल चालवणारा व्यक्ती हा कमीत कमी १८ वर्षे पूर्ण झालेला असावा, १८ वर्षांखालील मुलांना वाहन चालवण्यास पालकांनी देऊ नये, तसेच वाहन चालवताना आपली स्वतःची काळजी घ्यावी, वाहन चालक यांनी महामार्गावर दिलेल्या वाहतूक चिन्हांचे व सूचनांचे अनुसरून वाहन चालवणे व वाहतुकीचे नियमांचे पालन करणे, अपघातामधील व्यक्तींना तात्काळ योग्य ती मदत पुरवून झालेल्या अपघाताबाबत १००/१०८ /८६५२०८५५०० या क्रमांकावर कॉल करून घटनेबाबत माहिती द्यावी, रस्ता ओलांडताना पादचारी यांनी फुटपाथ अथवा भुयारी पूलाचा वापर करावा व रस्त्याचे आजुबाजुचे वाहन पाहून सुरक्षित रस्ता ओलांडावा, पावसाळ्यात वाहने स्लीप होण्याची शक्यता असते त्यामुळे वाहने सावकाश चालवावी या वाहतूक नियमाचे पालन करण्याबाबत मार्गदर्शन व मनोगत व्यक्त करून उपस्थित असलेल्या ७३ विद्यार्थी आणि ७३ पालक यांना एकूण १४६ मोफत हेल्मेट वाटप करून जनजागृती व प्रबोधन केले.



**पनवेल : भाजपचे उरण तालुका उपाध्यक्ष मुकूंद गावंड, ओबीसी सेलचे सचिव प्रा. प्रमोद म्हात्रे, सामाजिक कार्यकर्ते नितीन म्हात्रे, विनय सर आदींनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची त्यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली.**

## खारघरमध्ये आढळले मृत अर्भक

**पनवेल :** खारघर सेक्टर १३ मधील एका सोसायटीच्या आवारात स्त्री जातीचे नवजात मृत अर्भक आढळल्याची धक्कादायक घटना उघडकीस आल्यामुळे परिसरात खळबळ माजली आहे. या घटनेची नोंद खारघर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. मृत स्त्रीजातीचे अर्भक नागरिकांच्या निदर्शनास येताच परिसरात खळबळ उडाली. अर्थक पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणात नागरिकांची गर्दी जमली होती. खारघर पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला आहे.

## ट्रान्सपोर्ट व्यवसायिकाला अडीच लाखांचा ऑनलाईन गंडा

**पनवेल : वार्ताहर**

फेसबुकवर मारुती ओमनी कारच्या विक्रीची जाहिरात देऊन एका सायबर चोरटयाने पनवेलमध्ये राहणाऱ्या एका ट्रान्स्पोर्ट व्यवसायीकाकडुन ऑनलाईन दोन लाख ४२ हजार रुपये उकळून त्याची फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे. पनवेल तालुका पोलिसांनी या प्रकरणातील सायबर चोरट्याविरोधात फसवणुकीसह आयटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरू केला आहे.

या प्रकरणात फसवणूक झालेला ट्रान्सपोर्ट व्यवसायीक गणपत घोडके (वय ३६) हा पनवेल तालुक्यातील डेरवली गावात राहण्यास आहे. गत जुन महिन्यात गणपतला मुळगावी कुटुंबासह येण्या-जाण्यासाठी गाडी हवी असल्याने तो सेकंडहँड गाडीच्या शोधात होता. यादरम्यान, फेसबुकवर मारुती कंपनीची ओमनी गाडी ४५ हजार रुपयांमध्ये विक्रीसाठी उपलब्ध असल्याची जाहिरात त्याच्या निदर्शनास आली. त्यामुळे गणपतने जाहिरातीत असलेल्या गाडी मालक श्रीकांस सुर्वे याला संपर्क साधुन ही गाडी विकत घेण्याची तयारी दर्शविली.

या वेळी समोरील सायबर चोरटयाने तो भारतीय सेनेत कमांडर असल्याचे सांगून गणपतला कुरीयर स्लिप चार्जेस २ हजार रुपये व १५० रुपये पाठविण्यास सांगितले. सदर रक्कम पाठविल्यानंतर सायबर चोरटयाने डॉक्युमेंट चार्जेस, डीलीव्हरी चार्जेस अशी रक्कम पाठविण्यास सांगितले. रक्कम पाठविल्यानंतर सायबर चोरटयाने गणपतला गाडीची मुळ किंमत ट्रान्सफर करण्यास सांगितले. तसेच गाडीची डिलीव्हरी पाच तास उशिरा झाल्याने तसेच कॉम्प्युटर स्लिपचे कारण सांगुन गणपतला आणखी काही रक्कम पाठविण्यास भाग पाडले. अशा पद्धतीने सायबर चोरटयाने गणपतकडुन दोन लाख ४२ हजार रुपये उकळल्यानंतर गणपतने गाडी कधी पाठविणार अशी विचारणा केली असता, सायबर चोरटयाने सीआयएसएफचा कमांडट गाडी घेऊन येणार असल्याचे सांगून त्याचा मोबाईल नंबर पाठवून दिला, मात्र सायबर चोरट्याने आजपर्यंत ना गाडी पाठवली, ना त्याचे पैसे परत केले.

अखेर आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर गणपतने पनवेल तालुका पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात सायबर चोरटयाचा शोध सुरू केला आहे.



**नवीन पनवेल : येथील सेक्टर ११मध्ये दिनेश भाई यांनी चॉपस्टीक नावाचे नवीन दुकान सुरू केले आहे. त्याचे उद्घाटन शुक्रवारी माजी नगरसेवक समीर ठाकूर, रिटेल व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष नरसीभाई, सेक्रेटरी किसन पवार, खजिनदार वीरजी पटेल, कमिटी मेंबर विजय यांच्या उपस्थितीत झाले.**



**पनवेल : अनेक दिवसांपासून बागेश्री सोसायटीला पाणीपुरवठा कमी दाबाने होत असल्याची तक्रार सोसायटीचे अध्यक्ष व सेक्रेटरी यांनी माजी नगरसेवक नितीन पाटील यांच्याकडे केली होती. याची त्वरित दखल घेत त्या ठिकाणी पालिका कर्मचाऱ्यांमार्फत काम करवून घेतले. या वेळी सोशल मीडिया सेल शहर संयोजक प्रसाद हनुमंते, महेश सरदेसाई आणि प्रसाद कंधारे आदी उपस्थित होते.**



**पनवेल : सुकापूर येथील भाजप कार्यालयानजीकच्या गणेश मंदिरासमोरील अडथळा निर्माण करणारा लाईटचा पोल हटविण्यात आला आहे. या कामी भाजप सुकापूर कमिटी व सरपंच योगिता पाटील यांनी पाठपुरावा केला होता.**

## आपटा गावात आज विविध विकासकामांचा शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांच्या अल्पसंख्याक विकास निधी अंतर्गत आपटा ग्रुपग्रामपंचायत येथील विविध विकासकामे होणार आहेत. त्याचा भूमिपूजन सोहळा रविवारी (दि. २७) सकाळी ११ वाजता होणार आहेत.

पनवेल विधासभाम मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, उरण विधानसभा निवडणूक प्रमुख अरुणशेठ भगत, माजी जि. प. सदस्य ज्ञानेश्वर घरत यांच्या हस्ते भूमिपूजन होणार आहे. यामध्ये आपटा मोहल्ला येथील रस्ते काँक्रीटीकरण करणे (२० लाख रुपये), मस्जिद ते बाजारपेठकडे जाणारा रस्ता काँक्रेटीकरण करणे (१० लाख रुपये), दर्गाकडे जाणारा रस्ता काँक्रेटीकरण करणे (पाच लाख रुपये), आपटा सारसई बागेचीवाडी (आदर्शवाडी) घरकुल भूमिपूजन सोहळा होईल.

## खारघरमध्ये उद्या 'निधी आपके निकट'

**नवी मुंबई : बातमीदार**

कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना (ईपीएफओ), प्रादेशिक कार्यालय, वाशी, या वेळी पीएफ खातेदार, नवीन समाविष्ट संस्था आणि निवृत्तीवेतनधारकांच्या समस्या सोडवण्यासाठी त्यांच्या अखत्यारीतील एका ठिकाणी, मेसर्स डॉ. जीडी पोल फाउंडेशन, संस्थात्मक क्षेत्र क्षेत्र ०४, खारघर येथे सोमवारी (दि. २८) निधी आपके निकट २.० हा कार्यक्रम आयोजित करणार आहे.

खातेदारांना त्यांच्या कामासाठी क्षेत्रीय कार्यालय, वाशी येथे येण्याची गरज पडू नये यासाठी या महिन्याच्या २८ तारखेला निधी आपके निकलत २.० या कार्यक्रमात पीएफ, नवीन कव्हर केलेल्या संस्था आणि पेन्शनशी संबंधित तक्रारी ऐकून घेतल्या जातील. यासोबतच नव्याने समाविष्ट आस्थापनांच्या नियोक्त्यांना पीएफ संबंधित मार्गदर्शनही उपलब्ध करून दिले जाईल. यासाठी प्रादेशिक कार्यालय वाशी तर्फे जी डी पोळ फाऊंडेशन येथे सेक्टर ०४, खारघर या ठिकाणी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

या वेळी प्रादेशिक भविष्य निर्वाह निधी आयुक्त जे. पी. चौहान, म्हणाले की, या कार्यक्रमात नोडल अधिकाऱ्याकडून समस्या ऐकून घेऊन त्याचे निराकरण केले जाईल.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात मार्गदर्शन सत्र

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात शनिवारी (दि. २६) रिसर्च आविष्कार समितीतर्फे मार्गदर्शनपर सत्राचे आयोजन केले होते.

या मार्गदर्शनपर सत्रासाठी सीए डॉ. प्रदीप कामठेकर (अकाउंट व फायनान्स ऑफिसर युनिव्हर्सिटी ऑफ मुंबई) यांनी प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहून महाविद्यालयातील सर्व विभागातील विद्यार्थी व विद्यार्थिनी तसेच सर्व प्राध्यापकांना मुंबई विद्यापीठाच्या होणाऱ्या अविष्कार रिसर्च कन्वेंशन २०२३-२४ साठी संशोधनाचे विषय कसे निवडायचे, संशोधन पद्धती, गृहीतके, संशोधनामधील बारकावे, व संशोधन हे समाज हिताचे असावे याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले व सत्राच्या शेवटी विद्यार्थ्यांचे तसेच प्राध्यापकांचे संशोधनाशी संबंधित असणाऱ्या वेगवेगळ्या शंकांचे निरसन केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी उपस्थित राहून सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनीना तसेच प्राध्यापकांना संशोधनाविषयी मोलाचे मार्गदर्शन केले व शुभेच्छा दिल्या.

या सत्रासाठी प्रा. महेश्वरी झिरपे (समन्वयक अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष) तसेच सर्व विभागाचे विभाग प्रमुख, सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी हे आदी उपस्थित होते. या सत्राचे आयोजन प्रा. डॉ. दीपिका हसीजा यांनी केले तसेच प्रा. प्रथमेश ठाकूर, प्रा. प्रथमेश उदेकर, प्रा. डॉ. फारुख शेख, प्रा. डॉ. सायमा नाटेकर यांनी सहकार्य केले.



# सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात विविध उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात शनिवारी (दि. २६) विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबविण्यात आले.



वाहतुकीचे नियम व रस्ता सुरक्षेचे नियम कळावेत यासाठी गुरुकुल प्रकल्पांतर्गत आर.एस.पी. खारघर इन्चार्ज ललीता सिंग या बाह्यतज्ञ मार्गदर्शक म्हणून लाभल्या होत्या. गुरुकुल वर्गातील आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना त्यांनी रस्ता सुरक्षिततेचे नियम व एखादी घटना घडली असता प्रथमोपचार कसे करावे हे विविध उदाहरणांद्वारे समजावून सांगितले.

या वेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक डी.जी. हजारे यांनीदेखील १८ वर्षाच्या आतील विद्यार्थ्यांनी मोटार सायकल चालवू नये, वाहने वापरु नये अशी सूचना केली.


गुरुकुल विभाग प्रमुख ज्योत्स्ना ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना ट्रॅफिक सिग्नल चे नियम स्पष्ट केले व ललिता सिंग मॅडमचे आभार मानले. बाह्य तज्ञ ललिता सिंग यांना आमंत्रित करण्यासाठी व्ही.व्ही गावंड यांनी विशेष पुढाकार घेतला.

यासोबतच गुरुकुल प्रकल्पांतर्गत विद्यालयाच्या गुरुकुल प्रमुख ज्योत्स्ना ठाकूर मॅडम यांनी विद्यार्थ्यांना राख्या बनविण्यासाठी प्रोत्साहित केले व विद्यार्थ्यांनी स्वतः बनविलेल्या राख्यांचे खरी कमाई अंतर्गत स्टॉल लावण्यात आले.


विद्यालयाचे चेअरमन शरद खारकर यांनी या स्टॉलचे उद्घाटन करून विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक केले. त्यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूरसाहेब हे कमवा आणि शिका या योजनेअंतर्गत शिकले आणि प्रसिद्ध उद्योजक झाले. तसेच विद्यार्थ्यांनीदेखील स्वकमाईचे महत्त्व जाणावे असे आवाहन विद्यार्थ्यांना करून त्यांनी रक्षाबंधनाच्या शुभेच्छा दिल्या. गुरुकुल प्रमुख ज्योत्स्ना ठाकूर मॅडम यांनी हा उत्कृष्ट उपक्रम राबविल्याबद्दल चेअरमन शरद खारकर यांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले.


या वेळी विद्यालयाच्या उपशिक्षिका पी. आर. पवार, कसपटे ए. इ. मॅडम, एस. डी. पाटील, व्ही. ही. गावंड विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी आवर्जून उपस्थित होत्या. विद्यार्थ्यांनी बनवलेल्या राख्या मोठ्या प्रमाणात इतर विद्यार्थ्यांनी खरेदी केल्या.

# श्रावण-भाद्रपद पौराणिक चित्रपटांच्या भक्तीचा महिमा












**सत्तरच्या दशकात लहानपणी आमच्या गिरगावातील सदाशिव लेन, बनामा लेन येथे दुकानात विविध रंगाच्या राख्या दिसू लागल्या, मुगभाटात श्रीगणेश मूर्तींचे काम दिसू लागले की आम्ही समजायचो, श्रावण, भाद्रपद महिन्याचे आगमन होतेय आणि त्याच वेळेस मराठी वृत्तपत्रात शुक्रवारच्या चित्रपट सदरात पौराणिक चित्रपटाच्या बातम्या, फोटो वाचायला मिळत. प्रार्थना समाजला एकाद्या पौराणिक चित्रपटाचे होर्डींग्स दिसे आणि अशातच मॅजेस्टीक अथवा सेन्ट्रल, स्वस्तिक थिएटरला एकादा पौराणिक चित्रपट प्रदर्शित होई....**

समाजमन आणि चित्रपट यांच्या नात्यातील जणू ही गोष्ट आहे. पौराणिक चित्रपटांची आपल्याकडची परंपरा मूकपटांपासूनची. याचं कारण, तेव्हा 'चित्रपटासाठीची गोष्ट' याचा जन्म झाला नव्हता. जनसामान्यांना देव देवतांच्या गोष्टीत विशेष आनंद होत होता. दिग्दर्शक दादासाहेब फाळके यांचा 'राजा हरिश्चंद्र' (१९१३) हा आपल्याकडील पहिला मूकपट पौराणिक आहे. आणि त्या काळाशी ते अतिशय सुसंगत आहे. त्या काळात मोहिनी भस्मासुर, लंका दहन, कृष्ण जन्म, सैरंध्री, श्री कृष्ण सुदामा, शनी प्रभाव असे अनेक पौराणिक मूकपट निर्माण होत जाताना समाजाला या दृश्य माध्यमाची हळूहळू ओळख होत गेली. अशी पौराणिक गोष्ट चालत्या फिरत्या दृश्य स्वरुपात पाहणे म्हणजेच चित्रपट ही समज होत गेली. चित्रपती व्ही. शांताराम दिग्दर्शित 'अयोध्येचा राजा' (१९३२) हा आपल्याकडील पहिला मराठी बोलपट पौराणिक आहे. प्रेक्षकांना समजायला सोपी गोष्ट म्हणजेच देव देवतांच्या गोष्टी अशीच सरळ सोपी व्याख्या होती. 'बोलू लागलेला चित्रपट' समाजात रुजताना पौराणिक चित्रपट एक महत्वाचा घटक होता. माया मच्छिंद्र, रुक्मिणी हरण, भक्त प्रल्हाद, आकाशवाणी, कृष्णार्जुन युध्द, चंद्रसेना, कालियामर्दन, गंगावरण, गोपालकृष्ण, अकरावा अवतार, माया बाजार, गोरखनाथ, संत ज्ञानेश्वर अशा अनेक मराठी पौराणिक चित्रपटांची निर्मिती होत होत मराठी चित्रपटाचा प्रवास पुढे जात राहिला. याबरोबरच संतपट, ऐतिहासिक चित्रपट मग ग्रामीण चित्रपट वगैरेचे प्रवाह त्यात मिळत/मिसळत गेले.

हिंदीतही पौराणिक चित्रपटांची खूपच मोठी यशस्वी वाटचाल आहे. १९३२ साली 'भक्त प्रल्हाद' हा पौराणिक चित्रपट पडद्यावर आला. आणि पौराणिक चित्रपटांची दीर्घकालीन परंपरा सुरु झाली. तीदेखील स्वाभाविकच म्हणायला हवी. याचं कारण त्या काळातील जनसामान्यांना चित्रपटाकडून पौराणिक गोष्टीच्या मनोरंजनाची जास्त अपेक्षा असे. अशा चित्रपटांची पटकथा, त्याचे सेट्स, त्याचे छायाचित्रण, त्याचे संकलन यात फार दर्जा असावा अशीही अपेक्षा नसे. पडद्यावर गोष्ट दिसली तरी त्याचा आनंद होई. आणि साधारण जून ते सप्टेंबर या चार महिन्यांत हे मराठी व हिंदी पौराणिक चित्रपट प्रदर्शित होत. अनेक सणासुदीच्या दिवसांमुळे भक्तीमय वातावरण निर्माण झालेले असे. आणि पौराणिक चित्रपट पाह्यला हवी असलेली भावनिक मानसिक तयारी झालेली असे. 'पिक्चर एन्जॉय करायला एक मूड हवा असतो' असं म्हटलं जाते ते अशा चित्रपटांना केवढं पूरक. गिरगावातील मॅजेस्टिक थिएटरमध्ये हर हर महादेव, श्रीकृष्ण लीला अशा पौराणिक चित्रपटाच्या वेळी त्यातील अनेक दृश्यांचे उभे केलेले अतिशय ऐसपैस देखावे पाह्यलाही गर्दी होई. एकाद्या श्रीकृष्णच्या मूर्तीची पूजाही होई.

**झूम प्रहर**



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

अनेक शहरांत, ग्रामीण भागातील सिंगल स्क्रीन थिएटर्समध्ये पौराणिक चित्रपटाच्या एकाद्या पोस्टरला हार, अगरबत्ती, नारळ फोडून पूजा हे नित्याचेच. हे सगळं 'पहिल्याच दिवशी किती कोटी कमावले' अशा ब्रेकिंग न्यूज येण्यापूर्वीच्या काळातील वास्तव. त्या काळात चित्रपट म्हणजे समाजाचा भावनिक आधार होता, भरभरुन आनंद होता. थिएटरमधला बुकिंग क्लर्क, डोअर किपर आपल्याकडे रिलीज झालेल्या पिक्चरला गर्दी व्हावी अशी इच्छा बाळगे. त्यात हे पौराणिक चित्रपटाच्या 'पोस्टरची पूजा' म्हणजे जणू देव पूजाच.

होमी वाडिया, चंद्रकांत या निर्मात्यांनी पौराणिक चित्रपटात केवढे तरी सातत्य ठेवले. होमी वाडिया यांनी श्रीराम भक्त हनुमान (१९४८), श्रीगणेश महिमा ( ५०), हनुमान पाताल विजय (५१), श्रीकृष्ण लीला (७२) या पौराणिक चित्रपटांची तर चंद्रकांत यांनी हरी दर्शन (७२), बजरंगबली (७६), कृष्णा कृष्णा (८६). यासह अनेक पौराणिक चित्रपट येत राहिले. गोकुल का चोर, बद्रीनाथ धाम, भगवत गीता, बाल गणेश, हनुमान, शकुंतला, भगवान परशुराम, रामायण, महाभारत, वाल्मिकी, लव कुश, वाल्मिकी, संपूर्ण रामायण, शिव महिमा, अलख निरंजन, श्रीसत्यनारायण की महापूजा, शिवमहिमा, शिर्डी के साईबाबा वगैरे वगैरे. व्यावसायिक मूल्याच्या भाषेत सांगायचे तर छोट्या अथवा मध्यम बजेटमधील हे चित्रपट असत. त्यामुळे आर्थिक गुंतवणूक कमी आणि टप्प्याटप्प्याने प्रदर्शित होत होत वसूलीची गती समाधानकारक. या चित्रपटांचा प्रेक्षकवर्ग भाबडा आणि भक्तीत रमणारा असला तरी कालांतराने या चित्रपटांना मसालेदार मनोरंजक चित्रपटांची स्पर्धा जाणवू लागली. विशेषकरून पूर्वप्रसिध्दी व चित्रपटगृह यात स्थान मिळण्यात आव्हान निर्माण झाले आणि अशातच सतराम रोहरा निर्मित व विजय शर्मा दिग्दर्शित 'जय संतोषी मा' (मुंबईत रिलीज ३० मे १९७५) ने जणू लोकप्रियतेत प्रचंड क्रांती केली. मुंबईत अलंकार (मॅटीनी शो), एडवर्ड ( धोबीतलाव), किस्मत (प्रभादेवी) इत्यादी थिएटरमध्ये हा चित्रपट प्रदर्शित होताना जणू फार मोठे सामाजिक सांस्कृतिक वातावरण ढवळून काढणारे काही घडेल याची अजिबात कल्पनाच नव्हती. हिंदी चित्रपटातच एक हुकमी संवाद असतो ना, होनी को कौन टाल सकता है तसंच झालं. टेक्निकली सर्वसाधारण असलेला पण गीत संगीतात सोप्या चालीने खुललेला हा चित्रपट माऊथ पब्लिसिटीवर जोरात चालू लागला. कुठे काही भक्तांनी प्रत्येक शुक्रवारी हा चित्रपट पाह्यचाच असा जणू नवस केला. कुठे थिएटरबाहेर चपला काढून आत पिक्चर पाह्यला जात. कुठे मै तो आरती उतारी रे संतोषी माता की गाण्याला प्रेक्षक उभे राहून तेही आरती गाऊ लागले. आपल्या देशातील चित्रपट प्रेक्षक संस्कृती अशी भन्नाट आहे. पिक्चरने जोर पकडला आणि मग १५ ऑगस्ट १९७५ रोजी मुंबईत रमेश सिप्पी दिग्दर्शित 'शोले' आला, सुरुवातीस नरम रिपोर्ट असलेला 'शोले' मग खणखणीत यशस्वी ठरला तरी जय संतोषी माची जबरा क्रेझ कायम राहीली. इतकी की आजही या दोघांच्या तडाखेबंद यशाची तुलना होते.

जय संतोषी माच्या यशाने पौराणिक चित्रपटांची बरीच मोठी लाट आणली. मुख्य प्रवाहात ती सामावली. पौराणिक चित्रपटांनी जे पेरले ते ऐंशीच्या दशकाच्या अखेरीस रामानंद सागर यांच्या 'रामायण' आणि बी. आर. चोप्रा यांच्या 'महाभारत' या दूरदर्शनवरील पौराणिक मालिकांच्या पथ्यावर पडले. या एका मालिकेनंतर काही महिन्यातच दुसरीही मालिका आली. सगळीकडेच रविवारी सकाळी रस्ते ओस पडू लागले. पुन्हा एकदा सामाजिक वातावरण बदलून टाकले. पौराणिक गोष्टीत ही ताकद आहे. कालांतराने तांत्रिक प्रगती होत असतानाच अनेक पौराणिक मालिका येत राहिल्या. घटोत्कच, दशावतार, कृष्ण और कंस इत्यादी निमेशनपट आले. व्हीएफएक्स आले आणि 'आदिपुरुष' वगैरे आले. पौराणिक चित्रपटांचे बजेट अव्वाच्या सव्वा वाढले. त्यात मूळ गोष्टीतील आत्मा हरवला. पूर्वीचे पौराणिकपट साधेच असत आणि प्रेक्षकांच्याही त्यांच्याकडून फार अपेक्षा नसत.

श्रावण भाद्रपद महिन्यात पौराणिक चित्रपट पाह्यला मिळणार याचा विश्वास असे आणि तोच महत्वाचा असतो. थिएटरवरचे पौराणिक चित्रपटाचे देखावे पाहण्यातही आनंद घेण्याची एक पब्लिक संस्कृती होती. आपल्याकडील चित्रपट संस्कृती अशी सामाजिक सांस्कृतिक भावना जपणारी आहे. आणि त्याला दाद द्यायलाच हवी...


---

## निसर्गाचे सौंदर्य लाभलेला
# वाईचा पांडवगड

वाई ऊर्फ विराटनगरीला अनेक डोंगरांचा निसर्गरम्य वेढा पडलेला आहे. डोंगराच्या या वेढ्यात पांडवगड, वैराटगड, केंजळगड, अशी अनेक दुर्गरत्ने पाहायला मिळतात. वाईजवळ आले की, सारी दुर्गशिखरे त्यांच्या माना वर करत डोकाऊ लागतात. यातच त्यांच्या विशिष्ठ आकाराने उठून दिसतो तो पांडवगड!

या पांडवगडाकडे जाण्यासाठी दोन वाटा आहेत. एक म्हणजे वाईजवळच्या मेणवली गावातून, तर दुसरी धावडी गावाच्या हद्दीतून. या दोन्हीही वाट अंगावर येणाऱ्या पण त्यातही धावडीकडची तुलनेने थोडी कमी श्रमाची आहे. वाई मांढरदेव मार्गावर धावडी हे गाव. वाईहून याचे अंतर सात किलोमीटरचे. पांडवगडाला खेटून चार-पाच घरांची वस्ती लागते. इथून हा गड आणि त्यचा कातळ अगदी अंगावर येतो. येथे गिर्यारोहण करतांना बूट, पाठीवरची सॅंक घट्ट करायची आणि खंबीर पावलांनी गड चढू लागायचे.

पांडवगडची उंची सुमारे ४१७० फुट म्हणजेच १२७३ मीटर आहे. शिलाहार राजाभोज याने सातारा जिल्यात जे काही दुर्ग निर्माण केले त्यापैकी पांडवगड हा एक! निसर्गाचे सौंदर्य घेऊन जन्माला आलेला. छातीवर येणारा चढ आणि घनदाट झाडी पांडवगडचा हाच अनुभव ट्रेकर्सला सुरुवातीला अनुभवायला मिळतो. गिर्यारोहक सोडले तर मुळात इकडे कोणी येत नाही. चार गुरख्यांच्या वर्दळीने पडलेली पायवाट, पण पावसाला उलटला की या गडावर बेसुमार गवत माजते आणि आहे ती पाऊलवाटही झाकून जाते. हे गवतही अगदी डोक्याहून उंचीचे. अशा दाटीतून मार्ग काढत, गडाकडे सरकावे लागते. साऱ्या अंगाला गवताची कुसळे टोचू लागतात. सरपटणाऱ्या जीवांचे भय ते वेगळेच! त्यामुळे इकडे फक्त साहसी ट्रेकर्सच येतात, परंतु पांडवगडचा प्रवास कठीण असला तरी मात्र या प्रवासात निसर्गाचे सौंदर्य मिळते. याठिकाणी कारवी,



तेरडा, सोनकी, हळुंदा, लाजाळू कवळा, कोंबडतुरा व तालीमखाना अशा कधीहीण पाहिलेल्या रानफुलांचे दर्शन होते.

गडाच्या अगदी पायथ्याजवळ पायऱ्यांचे काही अवशेष दिसतात. गडाचा पहिला धागा या पायऱ्यामधूनच जुळतो. इथे माचीत शिरण्यापूर्वी एखादा दरवाजा असावा असे वाटते. माचीवरून पुढे निघताच वाटेत दोन पाण्याच्या टाक्या आहेत. गडावर एकूण दहा ते पंधरा खोदीव टाक्या, एक-दोन मोठाली तळी आहेत. पुढे निघताच बालेकिल्ल्यातील प्रवेशमार्ग येतो. एक खणखणीत बुरुज, त्याला लागून कड्याला प्रवेशद्वाराची कमान आणि त्यालगत काही अंतरावर चीराबंदी तट! त्याच्याकडे पाहताच पांडवगडचे दुर्गपण जागे होते. पांडवगडाला चहूबाजूंनी ताशीव खोल कडे यांमुळे तटबंदीची आवश्यकता आहे तिथेच ती घातलेली. प्रवेशद्वाराच्या पुढे मारुतीचे मंदिर आहे. मारुती मंदिराच्या पुढे गडावरील चुन्याची घाणी आहे. ठिकठिकाणी रंगबिरंगी बेढभ मंदिरे आणि चौका-चौकात धूळखात पडलेले पुतळे. पांडवगडावर गडदेवता पांडजाई देवीचे पडलेले मंदिर आहे. मंदिरासमोर शिवलिंग, नंदी, पादुका, वीर पुरुषाची एक मूर्ती आदि शिल्प दिसतात. गडांवर दिसणारे पाण्यासाठीचे दगडी भांडेदेखील इथे आहे. हे सारे पाहत असतानाच झाडीतल्या या मंदिरात जागोजागी मोठाल्या जाडजूड पाली नजरेस पडतात. यांचे रानटी रूप पाहून एकक्षण अंगाला काटा उमटतो.

पांडवगडाचा इतिहास पाहिल्यास समजते की पांडवगडही शिलाहार राजा भोजची निर्मिती! साधारणपणे इसवी सन ११७८ ते ९३ दरम्यान याला हे गडाचे रूप दिले गेले. पुढे आदिलशाही इथे आली. छत्रपती शिवरायांनी इसवी सन १६७३ हा गड स्वराज्यात आणला. त्यानंतर औरंगजेबाच्या वावटळीत १७०१ मध्ये तो मुघलांकडे गेला. यातून त्याची सुटका केली ती छत्रपती शाहूंनी. मराठ्यांकडील हा वारसा अखेर एप्रिल १८१८ मध्ये मेजर थॅचरने हिसकावून घेतला.

पांडवगडाचा हा प्रवास गवत-झाडींचे ते जंगल बाजूला सारत, वाट काढत सुरू असतो. यातून एक टोकाला यायचे आणि मग पुन्हा सारा मागचा गड आणि भोवतालच्या दऱ्याखोऱ्यांवर नजर फिरवल्यास सुरुवातीला उत्तरेकडील मांढरदेवीची डोंगररांग आणि तिच्यावर चमचमते देवस्थान दिसते. पूर्वेला खंबाटकी घाटाचा डोंगर, त्यापलीकडे नांदगिरी, चंदन-वंदन, वैराटगड रामराम करतात. दक्षिण अंगाला पाचगणी, महाबळेश्वरचे पठार त्याला जोडूनच पश्चिम अंगाला कमळगड आणि त्याअलीकडचा केंजळगड. या साऱ्यांच्या मधोमध चमचमते पात्र घेऊन संथ वाहणारी कृष्णा येते. तिच्या काठावरची ती धोम, मेणवली आणि प्राचीन वाईनगरी आणि जणू या साऱ्या देखाव्यावर लक्ष ठेऊन असलेला हा पांडवगड!

**(साभार : मराठी वर्ल्ड)**

---

# वन्यजीव संरक्षण कायदा



भारतीय संस्कृतीत वन्यजीवांना असाधारण महत्त्व असले तरी वन्य श्वापदे आणि पक्ष्यांच्या शिकारीचा छंद हा येथील लोकजीवनाचा अविभाज्य भाग राहिला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील कायद्यांचा पर्यावरणाकडे बघण्याचा दृष्टिकोन मिश्र स्वरूपाचा दिसतो. ब्रिटिश राजवटीत अनेक वन्य श्वापदांच्या शिकारीमागे मिळणाऱ्या बक्षिसीमुळे 'शिकारीच्या खेळा'ला अधिक महत्त्व प्राप्त झाले होते, मात्र काही तत्कालीन कायदे वन्यजीवांच्या संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरतात. २७ ऑगस्ट १९७२ रोजी वन्यजीव संरक्षण कायदा संमत झाला. त्यानिमित्त लेख..

'हत्ती जतन अधिनियम, १८७९' तसेच 'वन्यपक्षी संरक्षण अधिनियम, १८८७' किंवा 'सुधारित वन्यपक्षी आणि प्राणी संरक्षण अधिनियम, १९१२' यांकडे वन्यजीवांच्या संरक्षणाच्या दृष्टीने केलेले प्रारंभीच्या काळातील प्रमुख कायदे म्हणून बघता येईल. १९३५ साली जिम कॉर्बेट अभयारण्यासाठी लागू केलेला आणि सध्या 'यू.पी. नॅशनल पार्क अधिनियम, १९३५' म्हणून प्रचलित असलेला भारतातील वन्यजीवांच्या संरक्षणासाठी केलेला सर्वसमावेशक असा पहिला कायदा होता. 'भारतीय वन अधिनियम, १९२७' या कायद्याद्वारे आरक्षित अथवा संरक्षित वने घोषित करण्यात आली, तसेच अभयारण्येदेखील जाहीर करण्यात आली. अर्थात, शिकारीच्या खेळासाठी वन्यजीव राखणे हाच प्राथमिक उद्देश या कायद्यांमागे होता.

स्वातंत्र्योत्तर काळात भारतात आधी मुबलक असलेल्या वन्यजीवांचे नामशेष होणे अधोरेखित झाल्याने राष्ट्रीय पातळीवर वन्यजीवांचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी कायदा करणे आवश्यक झाले. भारतीय राज्यघटनेत केंद्र सरकारच्या तसेच राज्य सरकारच्या अधिकारांचे विभाजन केलेले आहे. प्राणी आणि पक्षी यांविषयी कायदे करण्याचा अधिकार राज्य सरकारांच्या अखत्यारीत असल्याने केंद्र सरकारला या विषयावर कायदे करण्यासाठी दोन किंवा अधिक राज्य सरकारांची संमती आवश्यक होती. ११ राज्यांनी संमती दिल्यामुळे 'वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२' हा केंद्रीय कायदा संमत करणे शक्य झाले आणि संपूर्ण देशासाठी एक कायदा अस्तित्वात आला.

वन्यजीवांच्या संरक्षणासाठी 'भारतीय दंड विधान संहिता, १८६०', 'फौजदारी प्रक्रिया संहिता, सीमा शुल्क अधिनियम, १९६२', 'भारतीय वन अधिनियम, १९२७', 'वनसंवर्धन अधिनियम, १९८१', 'प्राण्यांवरील अत्याचार प्रतिबंध अधिनियम, १९६०', 'जैवविविधता अधिनियम, २००२' हे कायदे वन्यजीव (संरक्षण) कायद्यासाठी पूरक ठरतात. तसेच भारतीय राज्यघटनेतील ४२ व्या घटनादुरुस्तीचाही सकारात्मक परिणाम वन्यजीव संरक्षणाच्या आणि संवर्धनाच्या दृष्टीने झाला आहे. वन्यजीवांवर मानवाची मक्तेदारी आहे या विचारातून ब्रिटिशकाळात अस्तित्वात आलेल्या कायद्यांकडून वन्यजीवांच्या अधिकारांचा विचार करण्याकडे कायद्यांची झालेली वाटचाल प्रगतिशील असली, तरी स्वातंत्र्योत्तर काळातील कायद्यांचा मूळ ढाचा मानवकेंद्रितच आहे.

**-ॲड. प्रवर्तक पाठक**


---

# वाईट विचारांवर करा चांगल्या विचारांची फवारणी..!

सध्या शेतीचा हंगाम सर्वत्र सुरू आहे. दडी मारून बसलेला पाऊस एक दोन दिवसापासून चांगलाच बरसतो आहे. शेतीचे बरीच कामे चांगल्या पद्धतीने सुरू आहेत. अशातच अनेकजण पिकांवर फवारणी करत आहेत. पण आताच ही फवारणी कशासाठी आणि का? कारण सुंदर डोलणाऱ्या अशा पिकामध्ये नको असलेले गवत वाढले आहे आणि पिकांवर कीड लागण्याची सुद्धा भीती आहे. संपूर्ण पिकाचे नुकसान मोठ्या प्रमाणात होऊ शकते. त्यामुळे पिकांतील गवत आणि कीड नष्ट झाली पाहिजे म्हणून फवारणी करणे अत्यंत गरजेचे आहे. कारण एकदा नको असलेला कचरा नष्ट झाला की, आपल्या आजूबाजूला मग सर्वच सुंदर होत असते..

माणसाच्या बाबतीतसुद्धा बऱ्याचदा असच घडते. मनुष्य म्हटले की, त्याचे चांगले-वाईट विचार, चांगले-वाईट संस्कार, आयुष्यामध्ये असलेली चांगली-वाईट माणसे, चांगली-वाईट वेळ अशा गोष्टी येतातच. त्यामुळे कधी आपले वाईट विचार आपल्या आयुष्याला खराब करतात तर कधी आपल्या सोबत असलेले काही माणसे आयुष्य खराब करून निघून जातात. कळत नकळतपणे आयुष्यात आलेली प्रत्येक वाईट गोष्ट माणसाच्या आयुष्याचे नुकसान करत असते. त्यामुळे वेळ असताना त्यावर चांगल्या विचाराची, चांगल्या निर्णयाची फवारणी करणे अत्यंत आवश्यक आहे. कारण चांगल्या गोष्टी वाचवायच्या असतील तर आधी वाईट गोष्टी नष्ट केल्या पाहिजे.

आपल्या आयुष्यामध्ये ज्या गोष्टी वाईट आहेत किंवा पुढे जाऊन ज्या-ज्या गोष्टीचा आपल्याला त्रास होणार आहे त्या सर्वाचा नेहमी अंदाज घेत राहिला पाहिजे आणि त्या सर्व



गोष्टींवर वेळ असतानाच घाव केला पाहिजे. कारण गवत लहान असताना फवारणी करून त्याला नष्ट करता येते परंतु एकदा गवत मोठे झाले आणि कीड लागण्यास सुरूवात झाली तर पिक उद्ध्वस्त झाल्याशिवाय राहत नाही. म्हणून सभोवतालच्या प्रत्येक गोष्टीवर नजर ठेवून, चांगल्या गोष्टींचा स्वीकार करत आणि वाईट गोष्टीना नकार देत आयुष्याचा प्रवास आपण केला पाहिजे. जेणेकरून आयुष्याचा हा प्रवास सुखकर आणि आनंददायी होईल.

अनेकदा आयुष्यातील क्षुल्लक अशा काही वाईट गोष्टीमुळे संपूर्ण आयुष्याला उतरती कळा लागते. आयुष्याचा तो काळ फार भयंकर असतो. आपल्याला सावरायचे असते पण आपल्या सभोवताल वाईट गोष्टीचा पसारा दिवसेंदिवस वाढत गेलेला असतो. अशा वेळी चांगले विचार, चांगली माणसे सोबत घेतली पाहिजे. कारण मनाने स्वच्छ असलेली माणसे आयुष्यात असतील तर उध्वस्त झालेले आयुष्य सुद्धा नव्याने सावरायला वेळ लागत नाही. म्हणून चांगल्या गोष्टी नेहमी जपून ठेवल्या पाहिजे मग विचार असो की माणसे. कारण चांगल्या गोष्टी सोबत असतील तर वाईट गोष्टींचा पराभव हा निश्चित आहे.

आयुष्याच्या प्रवास कितीही काळजीपूर्वक केला तरीही काही नको असलेल्या गोष्टी आपल्या हातून नकळतपणे घडतातच. त्यामुळे स्वतःला पूर्णपणे वाईट समजू नका. कारण ती वेळ म्हणजे आपल्या पुस्तकरुपी आयुष्याचा फक्त एक पान आहे. पान पलटला की, नवी कोरी पाने आपल्या समोर येत असतात. त्यामुळे आयुष्याची सुरूवात नव्याने पुन्हा करता येते. म्हणून आयुष्य कितीही सुंदर असेल तरीही गवतासारखा नको असलेला कचरा आपल्यामध्ये किंवा आपल्या आजूबाजूला तयार होत राहणारच आहे. त्यामुळे वेळोवेळी वाईट विचारांवर, चांगल्या विचारांची फवारणी आपण केली पाहिजे सुंदर आयुष्य जगण्यासाठी.

**-सुरज दहागावकर,**
**(चंद्रपूर)**

# पोलादपूर एमआयडीसीची लवकरच उभारणी

## आमदार प्रवीण दरेकर यांचे उद्योगमंत्र्यांना पत्र

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील उत्तरवाहिनी सावित्री नदीच्या पूर्वेकडील बाजूला असलेल्या जमिनींवर पंचतारांकित एमआयडीसी उभारण्यासाठी पोलादपूरचे भुमिपुत्र आमदार प्रवीण दरेकर यांनी उद्योगमंत्री ना. उदय सामंत यांना स्वत: पत्राद्वारे आवाहन केले. या अनुषंगाने उद्योगमंत्री ना. सामंत यांनी तुर्भे खुर्द, दिवील, कापडे, रानवडी परिसरात जमिनीसाठी ग्रामसभांचे आयोजन करून अनुकुलता प्राप्त करण्यासंदर्भात स्थानिकांसोबत चर्चा करण्याचे आदेश तुर्भे खुर्दच्या सरपंच महोदयांना दिले आहेत.




परिसरात जमिनीसाठी ग्रामसभांचे आयोजन

पोलादपूर तालुक्यातील सवाद-हावरे ते दिवील तुर्भे भागात कधीही दुबार पिके घेतली जात नव्हती. तशी मानसिकता तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये क्वचितच आणि अभावाने आढळते. या परिसरात शेतजमिनींपेक्षा ओसाड जमिनीचे क्षेत्र तुलनेत अधिक आहे, मात्र टेबललॅण्ड या सध्याच्या जमिनव्यावसायिकांच्या जमिनीच्या वर्णनामध्ये चपखल बसेल, असे येथील विस्तिर्ण क्षेत्र होते. ही जमिन संपादित करून त्यावर थेट विदेशी गुंतवणूकदारांमार्फत मॅकेनिकल इंडस्ट्रिज उभ्या राहणार होत्या. यामुळे एमआयडीसी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांसह तालुक्यातील सर्व सुशिक्षितांना चांगल्याप्रकारे रोजगारसंधी उपलब्ध होऊ शकत होत्या.


एमआयडीसीच्या नियोजित प्रकल्पाचे स्वरूप पंचतारांकित दर्जाचे होते. त्यामुळे निश्चितच होऊ घातलेले प्रकल्प पर्यावरणास घातक नव्हते. ३० जून २०२३ रोजी पोलादपूरचे भुमिपुत्र आमदार प्रवीण दरेकर यांनी विद्यमान उद्योगमंत्री ना. उदय सामंत यांना लिहिलेल्या पत्रामध्ये यापुर्वीच्या युतीसरकारच्या काळामध्ये मनोहर जोशी मुख्यमंत्री असताना तत्कालीन उद्योगराज्यमंत्री प्रभाकर मोरे यांनी पोलादपूर तालुक्यात पंचतारांकित एमआयडीसी सुरू करण्याच्या केलेल्या प्रयत्नांची माहिती देऊन पोलादपूर तालुक्यातील लोकसंख्येच्या स्थलांतरावरील उपाययोजना म्हणून पोलादपूर तालुक्यातच रोजगारनिर्मिती करण्यासंदर्भात पंचतारांकित एमआयडीसीची मागणी केली आहे.

या पत्राच्या अनुषंगाने उद्योगमंत्री ना.सामंत यांनी महाराष्ट्र राज्य औद्योगिक महामंडळामार्फत ३ ऑगस्ट २०२३ रोजीच्या पत्राद्वारे पोलादपूर तालुक्यातील तुर्भे खुर्द व अन्य ग्रामपंचायतीच्या सरपंचांना विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यास कळविले आहे. यानंतर विकासाकरीता देय क्षेत्राबाबत एमआयडीसी कार्यालयाला अवगत केल्यानंतर स्थळपाहणीसाठी एमआयडीसी कार्यालयाकडून दौरा करण्यात येईल तसेच या स्थळपाहणी दौऱ्यानंतर महामंडळाचे अधिकारी, स्थानिक प्रतिनिधी व लोकप्रतिनिधी यांच्यासोबत संयुक्त बैठक घेण्यात येईल, अशी माहिती या पत्राद्वारे देण्यात आली आहे.

# मुरूडमध्ये शॉक लागून चार म्हशींसह गायीचा मृत्यू

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड शहरातील भोगेश्वर पाखाडी मध्ये रहिवासी असणारे शेतकरी जयकांत महादेव भायदे व यांच्या मालकीच्या चार म्हशी व एका गायीला थ्रीपेज (४४० व्होल्टेज ) लाईनमधील तुटलेल्या तारेला शॉक लागुन म्हैशीचा व गायीच्या जागीच मृत्यू झाला. संबंधीत घटनेची माहिती तेजस भायदे यांनी मुरूड पोलीस ठाण्यात माहिती दिल्यावर मुरूड पोलीस निरीक्षक निशा जाधव यांनी घटनास्थळी येऊन पाहणी केली.



जयकांत भायदे हे मुरूड शहरातील भोगेश्वर पाखाडीमधील गरीब कुटुंबातले शेतकरी आहेत. आपल्याकडे आसणाऱ्या म्हैशी व गायीच्या दुधावर आपल्या परिवाराचे उदरनिर्वाह चालवत असतात.रोजच्या प्रमाणे सकाळी पी. के. मसाल यांच्या घराच्या मागे गावरान जागेवर चरण्यासाठी दुध देणाऱ्या ९ म्हैशी व २ गायी आणुन सोडल्या त्याठिकाणी आधीच थ्रीपेजची लाईनमधील एक विद्यूत तार गवतावर पडली होती, परंतु ती तार न दिसल्याने म्हशीना व गायींना सोडुन समोरच असणारे मसाल सरांच्या ओटीवर जाऊन बसले काही वेळातच म्हशी दिसु न आल्याने पाहता तर त्या जागेवर धुर येऊ लागला. ते बघण्यासाठी जात असताना मसाला सरांनी त्यांना अडवले की तिथे विद्युत तार पडली आहे. तुम्ही जाऊ नका. जर चुकुन जयकांत भायदे गेले असते तर मोठा अनर्थ घडला असता. तातडीने ही घटना महामंडळाच्या अधिकाऱ्यांना कळवली.ताबडतोब घटनास्थळी येऊन अधिकाऱ्यांनी विद्युतपुरवठा बंद करण्यात आला. तो पर्यंत दुध देणाऱ्या चार म्हशी व एक गायीचा मुत्यू झाला होता.

या घटनेचा आम्हाला खुप दुःख आहे. भरपाई मिळुन देण्याचे कामाला सुरुवात केली आहे. लवकरात लवकर ही भरपाई दिली जाईल, असे महाराष्ट्र राज्य विद्युत महा वितरणचे उपकार्यकारी अभियंता कृष्णा सुर्यवंशी यांनी सांगितले.

# महामार्गावर चोऱ्या करणाऱ्यांना अटक

**महाड : प्रतिनिधी**

महाड एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्य पोलीस निरीक्षक मारुती आंधळे यांच्यासह त्यांचे पोलीस पथक रात्री गस्त घालत असताना संशयास्पद झायलो गाडी दिसून येतात गाडीची तपासणी केली असता या झायलो कारमध्ये चोरून आणलेले स्टील आणि लोखंडी अँगल आढळून आले. या चोरांना महाड औद्योगिक पोलीस ठाण्यातील पोलीस पथकाने ताब्यात घेतले असून त्यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

महाड औद्योगिक पोलीस ठाण्याचे पोलीस शुक्रवारी रात्री गस्त घालत असताना झायलो गाडीचा यंशय आल्याने सदर गाडीची सविस्तर चौकशी केली. या वेळी गाडीत चोरून आणलेले स्टिल व लोखंडी अँगल आढळून आले. गाडीमध्ये आरोपी शुभम अनंत घाडगे (वय २०, रा. चांभार खिंड, मूळ रा. बिरमीणी, महाबळेश्वर,सातारा), प्रतीक हरीश घाडगे (वय २१, मुळ रा. बिरमीणी, महाबळेश्वर, सातारा) आणि अन्य एक जन अशा तिघांना ताब्यात घेतले असता त्यांच्याकडे रस्त्याला कडेला लावले जाणारे स्टीलचे अँगल, नटबोल्ट आढळून आले.

१२ लाख रुपये किमतीची एक चॉकलेटी रंगाची महिंद्रा कंपनीची झायलो (एम एच ०६ ए डब्ल्यू ६०६८), इंग्रजी सी आकाराची ०१ फुट १० इंच लांबीचे ६९ नग लोखंडी अँगल प्रत्येकी किंमत २९०० रुपये, २९,०० रुपये, इंग्रजी सी आकाराची २ फुट २० इंच लांबीचे पाच नग लोखंडी अँगल प्रत्येकी किंमत ५८०० रुपये, १८,९०० रुपयाचे इंग्रजी सी आकाराची एक फुट लांबीचे ७ नग लोखंडी अँगल प्रत्येकी किंमत २७०० रुपये, ४५००० रुपये किमतीचे ३०० नट बोल्ट, ४०० रुपये किमतीचे दोन रिंग पाने. असा एकूण १५,०३,३०० इतक्या किमतीचा चोरून आणलेला मुद्देमाल जप्त केला असून पुढील सुरू आहे.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की आमचे अशिलानी मौजे उमरोली ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत कायम स्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिनीचे वर्णन**
**मौजे उमरोली, ता. पनवेल, जि. रायगड**

| मौजे | जमिन भोगवटादाराचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार |
|---|---|---|---|---|---|
| उमरोली | अशोक दिनकर डांगरकर | ३ | ३ | ०.६६.४०<br>०. १३.१०<br>**०.८०.१०** | ७.२० |

**सरद जमिन मिळकतीपैकी ०.२२.०० गुठे जमिन मिळकत**

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, साठेकरार, वचनपत्र, कुळ, वहिवाट, लिज, अन्नवस्त्र, पोटगी, इजमेंट, वारसाहक्क, हुकूमनामा वगैरे असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **१५** दिवसांच्या आत आपली लेखी हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासहीत खालील सही करणार यांचेकडे रजि. पोस्टाने अथवा समक्ष दाखल करावी. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास वरील मिळकती या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून सदरचे मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व उशीरा येणा-या हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हयाची नोंद घ्यावी.

**ता. २६/०८/२०२३**
**पनवेल**

**सही/-**
**ॲड. प्रधान मधूकर पाटील**
**१३५, नगरपालिका कॉम्प्लेक्स,**
**ता.पनवेल, जि. रायगड**
**मोबाईल. ९३२४३७५५०२**


# मुरूड-साळाव मुख्य रस्त्याची दुरवस्था

## खड्डे भरण्याची मुरूड तालुका शिवसेनेची मागणी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुरूड-साळाव या मुख्यः रस्त्याची अतिशय दयनीय अवस्था झाली असून रस्त्यावरील खड्डी उखडली असल्याने अनेक अपघात होत आहेत. स्थानिकासह पर्यटकांनासुध्दा त्रास सहन करावा लागतो आहे. या रस्ताचे नुतनीकरण व दुरूस्ती गणेशत्सोवापुर्वी करण्यात यावी, अशी मागणीसाठी मुरूड तालुका शिवसेना यांनी २९ ऑगस्ट रोजी रास्ता रोको आंदोलन छेडले आहे.

मुरूड तालुका शिवसेना शिंदे गटाचे वतीने तालुका प्रमुख ऋषीकांत डोंगरीकर यांनी मुरूड-साळाव रस्ता नुतनीकरण व दुरूस्ती मागणीसाठी रास्ता रोको सारखे तिव्र जनआंदोलन छेदणार असल्याचे पत्र आमदार महेंद्रशेठ दळवी, मुरूड तहसिलदार, मुरूड पोलीस ठाणे, रेवदंडा पोलीस ठाणे यांना दिले असल्याचे कळविले आहे.

मुरूड ते साळाव मुख्यः रस्त्याला मोठे मोठे खड्डे पडले आहेत, या खड्डेमय रस्त्यातुन प्रवास करताना अंगावर चिखल उडत आहे, रस्त्यावरील खडी उखडलेली असल्याने रिक्षा, मोटर सायकल इत्यार्दी वाहनांने प्रवास करणाऱ्या नागरिकांना उखडलेल्या खड्डीवरून घसरून पडल्याने लहान मोठे अपघात होत आहेत. हे खड्डें सिमेंट कॉक्रिटने भरण्यात यावेत,जेणेकरून पावसाळ्यात खड्डे पुनस्यः उखळणार नाहीत. गणेश उत्सव लवकरच येत असून व मुरूड पर्यटन असल्याने गणेशत्सौव व पर्यटक यांच्या सुविधेसाठी मुरूड-साळाव रस्त्यावरील खड्डे सिमेंट क्राकिंटने भरण्यात यावे, अशी मागणी या निवेदन पत्रात केली आहे.

## निवडक

### जयवंत वाणी सेवानिवृत्त

**मुरूड :** नागाव केंद्राचे केंद्रप्रमुख जयवंत वाणी पस्तीस वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर निवृत्त झाले. माणगाव, पोलादपूर, मुरूड, अलिबाग अशा विविध तालुक्यात त्यांनी आजवर उपशिक्षक, मुख्याध्यापक, पदवीधर शिक्षक, विषयतज्ज्ञ, विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख अशा विविध प्रकारच्या जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळल्या. मुरूड तालुक्यातील त्यांच्या विशेष शैक्षणिक कामगिरीबद्दल रायगड जिल्हा परिषदेकडून 'जिल्हा आदर्श शिक्षक' पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले होते. या वेळी मुंबई येथे उच्च पदावर कार्यरत असणाऱ्या त्यांच्या प्रशांत महाडिक या विद्यार्थ्यासह अनेकांनी वाणीसरांबद्दलचे आपले अनुभव मनोगतातून व्यक्त केले. या वेळी उपस्थित मान्यवरांकडून त्यांना शाल, श्रीफळ, भेटवस्तू आणि सन्मानपत्राने गौरविण्यात आले.




# माणगावमधील संगमेश्वर मंदिर परिसराची स्वच्छता

## छत्रपती करिअर अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी केले श्रमदान

**माणगाव : प्रतिनिधी**

संपूर्ण माणगावकरांचे श्रद्धास्थान असलेल्या माणगाव नगरपंचायत हद्दीतील जुने माणगाव येथील श्री संगमेश्वर मंदिराच्या परिसराची स्वच्छता शनिवारी (दि. २६) छत्रपती करिअर अकॅडमीच्या विद्यार्थी, विद्यार्थिनींनी आपले मार्गदर्शक पोलीस निवास साबळे व अकॅडमीच्या संस्थापिका माधुरी निवास साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली करून मंदिर परिसर चकाचक केला.





छत्रपती करिअर अकॅडमी, आर्मी व पोलीस भरती प्रशिक्षण केंद्र माणगावच्या विद्यार्थी, विद्यार्थिनींनी शनिवारी सकाळी आपले शरीर तंदुरुस्त राहण्यासाठी निजामपूर रोड माणगाव येथून धावत जुने माणगाव परिसरात आले होते. यामध्ये अकॅडमीचे ४० विद्यार्थी, विद्यार्थिनी सहभागी झाले होते. या विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारे घडविण्याचे काम अकॅडमीच्या संस्थापिका माधुरी साबळे व पोलीस निवास साबळे हे करीत आहेत. या विद्यार्थ्यांना या अकॅडमीत त्याचे ज्ञान देऊन प्रशिक्षण दिले जाते.

विद्यार्थ्यांनी आर्मी व पोलीस खात्यात भरती झाल्यावर त्यांना देशसेवा करावी लागते. यासाठी प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सामाजिक उपक्रमांची आवड निर्माण व्हावी याकरिता हि अकॅडमी आपले विद्यार्थी हे सर्वगुण संपन्न असले पाहिजेत. या विचारधारेने प्रेरित होऊन कार्य करीत आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी नजरेसमोर ठेवून सामाजिक उपक्रमातही पुढे यावे या उदात्त हेतूने त्यांना स्वच्छतेचा संदेश अकॅडमी चालकांनी दिला आहे.

या अकॅडमीच्या विद्यार्थी, विद्यार्थिनींनी माणगाव नगरपंचायत हद्दीतील जुने माणगाव येथील संपूर्ण माणगावकरांचे श्रद्धास्थान असलेल्या संगमेश्वर मंदिरात येऊन दर्शन घेऊन परिसराची स्वच्छता केली. या वेळी पोलीस निवास साबळे, संगमेश्वर नगरातील रहिवासी सचिन गोरेगावकर, मंदिराचे पुजारी हरेश जंगम उपस्थित होते. छत्रपती करिअर अकॅडमीच्या या उपक्रमाचे देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष संजयआण्णा साबळे व त्यांचे सहकारी तसेच संगमेश्वर ग्रामस्थांबरोबरच संपूर्ण माणगावकरांनी विशेष कौतुक केले आहे.


## सावधान नोटीस

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे- रोहींजण, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड**

| मालकांची नावे / कब्जेदारांची नावे | गट/ सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| १) श्री. आणणा बाळ्या उर्फ बळीराम म्हात्रे<br>२) श्रीमती येसुबाई हरचंद म्हात्रे<br>३) श्रीमती निर्मला मनोहर रुपेकर<br>४) श्रीमती हौसा परशुराम म्हात्रे<br>सर्व राहणार- खुटारी, तालुका- पनवेल, जिल्हा - रायगड | ४१ | १+२अ | १-२६-६ | १२.१३ |

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, माझे अशिल यांनी वर नमुद मिळकत वर नमुद जमीनीचे मालक / कब्जेदार यांचेकडून खरेदी केलेली आहे. व तसा करार वर नमुद जमिन मालकांनी माझे आशीलाचे लाभात लिहुन दिलेला आहे व सदर नमुद मिळकत माझे अशिलांचे नावे करुन देण्याचे मान्य व कबुल कलेले आहे. तसेच सदर वर नमुद मिळकती करीता वर नमुद जमीनीचे मालक यांना माझे अशिलांनी बरीच रक्कम दिलेली आहे. तसेच वर नमुद जमीनीचे मालक यांनी माझे आशीलांचे लाभात लिहुन दीलेला करार हा आजही अस्तीत्वात असून तो त्यांचेवर बंधनकारक आहे.

तरी माझे अशिलांचे वतीने मी ॲड जे.डी पाटील तमाम लोकांस या नोटीसीद्वारे कळवितो की, वर नमुद मिळकतीवर माझे अशीलांचे हक्क, हितसंबंध व अधिकार निर्माण झालेले आहेत व ते आजही अस्तीत्वात आहेत. तरी वर नमुद मिळकतीबाबत कोणीही, कसल्याही प्रकारचा व्यवहार करु नये. याहुन उपर वर नमुद मिळकतीबाबत कोणीही कसल्याही प्रकारचा व्यवहार केल्यास त्यांना /संबंधीतास होणाऱ्या नुकसानीस माझे अशिल जबाबदार राहणार नाहीत तसेच असा कोणताही व्यवहार केल्यास तो माझे आशीलांवर बंधनकारक राहणार नाही याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल,
दिनांक : २७/०८/२०२३

**सही/-**
**ॲड.जे.डी.पाटील**
**(बी.एस.एल.,एलएल.बी.)**
मुणोत रेसीडेन्सी, शॉप नं.७ व ८ एच.ओ.सी.कॉलनी समोर, जूना ठाणा नाका रोड, पनवेल,
ता.पनवेल,जि.रायगड ४१०२०६.


# रोह्यात स्वच्छता आणि रस्ता सुलभीकरण अभियान

**रोहे : प्रतिनिधी**



रोहा अष्टमी नगरपरिषदेच्या वतीने रोहा शहरातील मुरुड रोहा कोलाड मार्गावरील श्री धावीर महाराज कमानी ते नवरत्न हॉटेल या दरम्यान स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

या स्वच्छता अभियानात प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवल, तहसीलदार किशोर देशमुख, अप्पर तहसीलदार प्रकाश म्हेत्रे, नायब तहसिलदार राजेश थोरे, काकडे मॅडम, नगरपरिषदेचे प्रशांत माने, नगर परिषद अधिकारी निवास पाटील, ओंकार भुरण, स्वप्नील तोडणकर, रचना पार्टे, प्रसाद शिंदे, उदयनाथ ठाकरे, आनंद बंडगर, राजेश सांबरे, मदन शिवशरण, रवींद्र आयनोडकर, नगर परिषदेचे स्वच्छता कर्मचारी, तहसील कार्यालयातील कर्मचारी, सी. डी. देशमुख शाळेचे विद्यार्थी सहभागी झाले होते.

जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांच्या निर्देशानुसार रोहा - अष्टमी नगर परिषद मार्फत स्वच्छ्ता व रस्ता सुलभीकरण अभियान अंतर्गत स्वच्छ्ता व रस्ता सुलभीकरण अभियान रोह्यात राबविण्यात आले. अभियानासाठी मुरुड-रोहा-कोलाड हा रस्ता निवडण्यात आला होता.

या अभियानाची सुरुवात सकाळी ८ वाजता उपविभागीय अधिकारी श्री ज्ञानेश्वर खुटवड यांच्या हस्ते करण्यात आली. श्री धावीर महाराज कमानी, तहसीलदार कार्यालय ते नवरत्न हॉटेल पर्यंत रस्त्याची स्वच्छ्ता, सुलभीकरण करण्यात आले. यादरम्यान सर्व दुकानदारांना स्वतःचा कचरा इतरत्र न फेकता व्यवस्थित साठवून घंटा गाडी मध्येच टाकण्याचे आवाहन करण्यात आले. या अभियानात सी. डी. देशमुख शाळेचे विद्यार्थी शहरात स्वच्छता अभियानात सहभागी होवुन त्यांनी ठिक ठिकाणी स्वच्छता केली.



या वेळी प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवल यांनी व्यापारी वर्गांना कचरा आपल्या दुकानासमोर कचरा टाकु नये आपला परिसर स्वच्छ ठेवावे. नगरपरीषदेच्या कचरा संकलन गाडीतच कचरा टाकावे असे आवाहन करीत आपली वाहने मुख्य रस्त्यावर पार्कींग करु नये, असे सांगितले. या वेळी रिक्षा चालक मालक, रोहयातील व्यापारी यांच्याशी संवाद साधण्यात आला.

# बाहेरील खाद्यपदार्थांमुळे आजारांना आमंत्रण

## सेवन टाळण्याचे आहारतज्ज्ञांसह डॉक्टरांकडून आवाहन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सध्या पावसाचे दिवस आहेत. रेल्वेस्थानकाच्या बाहेर तसेच रस्त्याच्या कडेला अनेक फेरीवाले उभे असतात. या फेरीवाल्यांकडे मिळणारे खाद्यपदार्थ हे कोणत्याही प्रकारची स्वच्छता सुरक्षितता बाळगून केलेले दिसून येत नाहीत. हवामानात ओलसरपणा असल्याने सर्दी, ताप अशा आजारांना आमंत्रण मिळते. अन्नपदार्थ जंतू वाढण्याची शक्यता असते. त्यामुळं बाहेर फेरीवाल्यांकडे मिळणाऱ्या अन्नपदार्थांमध्ये विकले जाणारे पदार्थ हे कधीही बनवलेले असतात. त्यात पॅटिस, सँडविच साठी वापरले जाणारे ब्रेड कधीचेही असते. त्यामुळे बाहेरील पदार्थ खाणे पूर्णपणे टाळणे आवश्यक आहे.



रेल्वे स्थानकांमध्ये जी दुकाने लावलेली असतात त्यामध्येदेखील पदार्थ बनवणाऱ्याकडे स्वच्छ पाणी, इतर बाबतीत टापटीप किंवा एखाद्या व्यक्तीला पदार्थ देताना हँडगोलज नसतात. फेरीवाल्याकडे मिळणारे वडापाव, वेगवेगळ्या प्रकारची भज्जी, पॅटिस, कटलेट, समोसा, पाणी पुरी, अंडा भुर्जी, सारखे अनेक प्रकार उपलब्ध असतात हेच पदार्थ नागरिकांचे आरोग्य बिघडविण्यास कारणीभूत असतात.

रस्त्यावरील फेरीवल्याकडे विकले जाणारे खाद्यपदार्थ हे नीट झाकलेले नसतात किंवा कोणतीही स्वछता न बाळगता बनवतात, त्यात फेरीवल्यावर कारवाई करणे ही पालिकेची जबाबदारी आहे. मात्र नेरुळ, जुईनगर सानपाडा, वाशी, सह इतर परिसरामध्ये फेरीवाले हक्काने पदार्थांची विक्री करत असल्याचे पाहायला मिळतात. नेरूळ राजीव गांधी ब्रिजच्या खाली तर चारही बाजूने फेरीवल्याच्या गाड्या उभ्या असतात या सर्व फेरीवाल्यांवर पालिकेचे दुर्लक्ष होत असल्याचे पाहायला मिळत आहे.

फेरीवल्याकडे पालिकेने केलेल्या दुर्लक्षामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. पावसाळ्यामध्ये आजूबाजूच्या दवाखान्यामध्ये रुग्णाची गर्दी पाहायला मिळते. अनेक हॉस्पिटलमध्ये तर रुग्णांना नंबर लावून ताटकळत उभे राहावे लागत आहे. पावसाळ्यामध्ये बाहेरील न झकलेले खाद्यपदार्थ खाल्ल्याने जंतुसंसर्ग होतात, डेंग्यू मलेरिया सारख्या आजारांचा सामना करावा लागतो आजारांचे कारण कोणतेही असले तरीही स्वच्छता हाच खबरदारीचा उपाय आहे. हिवताप, मलेरिया यांसारख्या आजारांचा प्रादुर्भाव पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर होतो.

पावसाचे दिवस असल्याने रस्त्यावरील फेरीवाल्या जवळ असलेले खाद्यपदार्थ खाणे टाळावे. पाणी उकळून प्यावे पूर्णपणे स्वच्छता राखावी बाहेरील खाद्यपदार्थ खाण्यापेक्षा घरी करून खावे किंवा ज्या ठिकाणी स्वच्छता असेल आणि पदार्थही झाकलेले असतील अशाच ठिकाणी पदार्थ घेऊन खावे अन्यथा बाहेरील खाणे पूर्णपणे टाळावे.

शरीर ही खरी संपत्ती आहे. त्यामुळे स्वतःची पूर्णपणे काळजी घ्यावी, असे डॉ. अनिरुद्ध जोशी यांनी सांगितले आहे.

**पावसाळ्याच्या दिवसांमध्ये खाद्यपदार्थांवर लक्ष दिले पाहिजे .जेणेकरून त्या पदार्थांपासून आपल्या आरोग्यास हानी पोहोचणार नाही. गरम ताजे पदार्थ घरी केलेले खावेत विशेष करून बाहेरील खाणे टाळावे .पाणी उकळून प्यावे शिळे अन्नपदार्थ खाऊ नयेत.**

**–स्मिता शिरोळे**
**आहारतज्ज्ञ**

**अनधिकृतपणे व्यवसाय करणार्या फेरीवाल्यांवर विभागीय कार्यालयाकडून कारवाई वेळोवेळी सुरू असते. आपन निदर्शनास दिलेल्या ठिकाणी कारवाई करण्याचे आदेश दिले जातील.**

**सोमनाथ पोटरे**
**उपायुक्त (अतिक्रमण)**
**नवी मुंबई मनपा**

# नवी मुंबईतील गणेशोत्सव मंडळांचे मंडप भाडे माफ करण्याची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना अनामत रक्कम व जागेचे भाडे आकारण्यात येऊ नये याबाबतचे आदेश दिले आहेत. त्यानुसार नवी मुंबईतदेखील मंडळांना भाडे माफ करावे, अशी मागणी आमदार मंदा म्हात्रे यांनी आयुक्त राजेश नार्वेकर यांच्याकडे केली आहे.



गणेशोत्सव हा २५ दिवसांवर आला असताना सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची विविध परवानग्यासाठी धावपळ सुरू आहे. मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना मंडप भाडे व अनामत रक्कम आकारण्यात येवू नये असा निर्णय घेण्यात आला आहे, तसेच याची अंमलबजावणी म्हणून ठाणे महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी निर्णय घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश दिले आहेत. त्यामुळे मुंबई, ठाण्यातील मंडळांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. अनेक लहान मंडळांच्या डोक्यावरील काहीसा आर्थिक ताण दूर झाला आहे.

नवी मुंबई पालिकेतदेखील सार्वजनिक गणेशोत्सव मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात. त्यातून ही मंडळे सामाजिक जनजागृती करत असतात. या मंडळाचा वापर करत पालिकेकडून देखील तिथे स्वच्छता, आरोग्य विषयक तसेच विविध उपक्रमांवाबत जनजागृती केली जाते. या मंडळांकडून भाडे वसूल करून त्यांचा वापर पालिका फुकटात जनजागृतीसाठी वापर करत असते.

गणेशोत्सव मंडळेदेखील पालिकेला सर्वतोपरी मदत करत असतात. या सर्व बाबी लक्षात घेता मंडळांकडून घेण्यात येणारे भाडे पालिकेने माफ करावे. जेणेकरून लहान सहान मंडळांना वरील आर्थिक भार कमी होईल, अशी मागणी आमदार मंदा म्हात्रे यांनी आयुक्तांकडे केली आहे.

**याबाबत मी आयुक्तांशी चर्चा केली आहे. आयुक्तांनी सकारात्मकता दाखवली आहे. गणेशोत्सव मंडळांचे भाडे मद झाल्यास त्यांना दिलासा मिळेल. गणेशोत्सव मंडळे सामाजिक सलोखा कायम ठेवत उत्सव साजरा करत असतात. त्यामुळे प्रशासनाला मदतच होते. या बाबी पालिकेने लक्षात घ्याव्यात.**

**–मंदा म्हात्रे, आमदार,**

# इमारत दुर्घटना टाळण्यासाठी सोसायट्यांचे स्ट्रक्चरल ऑडिट करा

## भाजप जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांचे आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई जिल्हा भाजप अध्यक्ष संदीप नाईक यांनी नेरुळ सेक्टर ६ येथील स्लॅब कोसळलेल्या तुलसी भवन सोसायटीला शुक्रवारी (दि. २५) भेट दिली.



नेरूळ सेक्टर ६ येथील तुलसी भवन सोसायटीमधील इमारतीचा स्लॅब बुधवारी अचानक कोसळला. या दुर्घटनेत दोघांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे, तर सहा जण जखमी झाले आहेत. जखमींवर डी. वाय. पाटील रूग्णालयात उपचार सुरू आहेत. ही इमारत १२.५ टक्के भूखंडावर बांधण्यात आली आहे. या इमारतीला १९९८–१९९९मध्ये ओसी मिळाली होती. इमारतीमधील घराचे दुरुस्तीचे काम सुरू असताना सदर दुर्घटना घडली. भाजप जिल्हा अध्यक्ष संदीप नाईक यांनी घटनास्थळाला भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला व येथील रहिवाशांबरोबर चर्चा देखील केली. जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या नागरीकांना श्रद्धांजली वाहिली.

अतिवृष्टी, जुन्या तंत्रज्ञानाने केलेले बांधकाम व त्या काळचे बांधकाम साहित्य याचा परिणाम बांधकामावर होत आहे. आणि अश्या दुर्घटना घडत आहेत. आज एमआयडीसी भागात, गावठाण भागात, सिडकोनिर्मित इमारती, तसेच वाणिज्य वापराच्या अनेक इमारती धोकादायक झाल्या आहेत. आणि म्हणून संबंधित प्राधिकरण म्हणजेच सिडको,एमआयडीसी, महापालिका यांच्यासह सोसायटी आणि नागरिकांनी जागरूक राहून पुढाकार घेत स्ट्रक्चरल ऑडिट करावे, जेणेकरून भविष्यात अशा दुर्घटना होणार नाहीत आणि जीवितहानी होणार नाही, असे आवाहन जिल्हाध्यक्ष नाईक यांनी केले. त्यांनी असेही सांगितले की, धोकादायक इमारतींमध्ये जीवितहानी होऊ नये या गोष्टीचे गांभीर्य प्रत्येकाने घेणे गरजेचे आहे.

# पावसाळा बंदी कालावधीत मच्छीमारांना खावटी अनुदान द्या

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

कोकण किनारपट्टीवरील मच्छीमार बांधवांना पावसाळी मासेमारी बंदी कालावधीत खावटी अनुदान देण्याची मागणी कोळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष व भाजप आमदार रमेश पाटील यांनी मत्स्य व्यवसायमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे केली.

दरवर्षी जून ते ऑगस्ट या पावसाळी हंगामात मासेमारी व्यवसाय बंद असतो. या कालावधीत खोल समुद्रात जाऊन मासेमारी करण्यास शासनाकडून बंदी घालण्यात आलेली आहे. यामुळे किनारपट्टीवरील पारंपारिक मच्छीमार बांधवांचा मासेमारी व्यवसाय बंद असल्याने त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे मच्छीमार बांधवांना दिलासा देण्याकरता आपल्या राज्याच्या शेजारील तामिळनाडू व आंध्रप्रदेश राज्यात दिल्या जाणाऱ्या खावटी अनुदानाच्या धर्तीवर महाराष्ट्र शासनानेदेखील खावटी अनुदान देण्यासाठी आमदार रमेश पाटील गेल्या अनेक दिवसांपासून पाठपुरावा करत आहेत. ‍त

यानुसार २४ ऑगस्ट रोजी आमदार पाटील यांनी मत्स्य व्यवसाय मंत्री यांची भेट घेऊन किनारपट्टीवरील मच्छीमार बांधवांना तामिळनाडू व आंध्र प्रदेश राज्यांच्या धर्तीवर खावटी अनुदान देण्याची मागणी केली.



**आमदार रमेश पाटील यांची मागणी**

यासोबतच मच्छीमार बांधवांचा दहा लाखापर्यंत अपघात विमा काढण्याचीदेखील मागणी केली.

त्याचप्रमाणे रायगड जिल्हा कार्यक्षेत्रातील मासेमारी बोटीवरील स्थानिक भूमिपुत्र असलेल्या खलाशी व तांडेल यांना चारित्र्य पडताळणीच्या सक्तीमधून वगळण्यात यावे, अशी विनंती केली.

यावर मत्स्य व्यवसाय मंत्री यांनी किनारपट्टीवरील मच्छीमार बांधवांना पावसाळी हंगामातील मासेमारी बंदी कालावधीमध्ये खावटी अनुदान देण्यासंदर्भात अभ्यास करून अहवाल सादर करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या असल्याची माहिती आमदार पाटील यांनी दिली. तसेच मच्छीमार बांधवांच्या इतर प्रश्नांवर सरकार सकारात्मक असून मच्छीमारांच्या विकासासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले.

# सानपाडा येथील फेरीवाला मार्केट खुले करण्याची मागणी

**नवी मुंबई :** सानपाडा येथील फेरीवाला भाजीपाला आणि फळे मार्केटचे बांधकाम पूर्ण होऊन तीन वर्ष पूर्ण झाली तरी बंद असलेले मार्केटचे उद्घाटन करून ते फेरीवाल्यांसाठी खुले करावे, अशी मागणी श्री गणेश फेरीवाला संघटनेचे अध्यक्ष जयश्रीताई आहेर यांनी पालिका आयुक्तांकडे केली आहे.

शहरांतील रस्त्यावर, पदपथावर परवानाधारक फेरीवालासोबत काही विनापरवाना फेरीवालेदेखील उघड्यावर व्यवसाय करत आहेत यामुळे, शहराला फेरीवाल्यांचा उपद्रव्य वाढत असल्याने तो थाबवावा यासाठी, सानपाडा येथील मार्केटचे उद्घाटन करून ते व्यवसायासाठी खुले करावे, अशी मागणी जयश्रीताई आहेर यांनी पालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांना दिलेल्या निवेदनातुन केली आहे.

# नेरूळमध्ये आरोग्य कार्डवाटप

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नेरूळ नोडमधील महापालिका प्रभाग ९६ मधील रहिवाशांना माजी नगरसेविका रूपाली किस्मत भगत व सामाजिक कार्यकर्ते गणेश भगत यांच्या माध्यमातून आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेच्या कार्डचे सदस्यांना वितरीत करण्यात आले.



या अभियानात स्थानिक रहीवाशांना आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेचे सदस्यत्व देण्यात आले. सदस्यत्व घेतलेल्या २४९ रहीवाशांना कार्डचे माजी नगरसेविका रूपाली किस्मत भगत व सामाजिक कार्यकर्ते गणेश भगत यांच्या माध्यमातून वितरण करण्यात आले.

या वेळी समाजसेवक गोरक्षनाथ गांडाळ, महादेव जगताप, बबन शिंदे, प्रदीप कलशेट्टी, मनोहर कार्तुर्ड, विकास तिकोणे, रविंद्रनाथ चव्हाण, दिलीप राऊत, रमाकांत कलंबे, संतोष शिंदे उपस्थित होते.

# सानपाड्यात मैदानावर गवत वाढल्याने खेळ बंद



**नवी मुंबई : बातमीदार**

सानपाडा येथील सीताराम मास्टर उद्यान हे समस्यांनी घेरले आहे. मैदान जंगली गवताने व्यापल्याने नागरिकांचा, मुलांचा विरंगुळा बंद झाला आहे. त्यामुळे नागरीक संताप व्यक्त करत आहेत. वाढलेल्या गवतामुळे नागरिकांचे चालणे फिरणे व मुलांचे खेळ बंद झाल्याने नागरिकांकडून नाराजी व्यक्त होत आहे. सानपाड्याचे नागरिक महापालिका प्रशासनाकडे कर भरत नाही काय? असा प्रश्न भाजपचे पांडुरंग आमले यांनी महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांना निवेदनातून विचारला आहे.

सानपाडा, सेक्टर ९ मध्ये मिलेनिअम सोसायटी व नवभारत प्रेसच्या समोर महापालिकेचे सिताराम मास्तर उद्यान आहे. या उद्यानात सानपाडा कॉलनीतील रहिवाशी या उद्यानात चालण्यासाठी व फिरण्यासाठी येत असतात. सानपाडा, नेरूळ, जुईनगर, तुर्भे परिसरातील हे मोठे व विस्तिर्ण उद्यान व क्रिडांगण आहे. गवत काढल्यास मुलांना क्रिकेट, फुटबॉल खेळणे शक्य होईल. नेरूळ सेक्टर ४ मधील क्रिडांगणाची पालिका प्रशासनाने रविवारी सफाई केली आहे.

नेरूळची क्रिडांगणावरील जंगली गवत पालिका प्रशासन काढू शकते, तर सानपाडा सेक्टर ७ मधील सिताराम मास्तर उद्यानातील जंगली गवत का काढले जात नाही? गवतामुळे डासांचा व चिलटांचा त्रास नागरीकांना होत आहे. पालिकेने या सर्व समस्यांकडे लक्ष द्यावे, अशी मागणी पांडुरंग आमले यांनी महापालिका आयुक्तांकडे केली आहे.

# प्लास्टिक पिशव्यांचा वापर करणाऱ्या ऐरोलीतील व्यावसायिकांवर कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

नागरिकांनी प्लास्टिकचा धोका ओळखून प्लास्टिक पिशव्यांचा वापर पूर्णपणे टाळावा तसेच पर्यायी कापडी व कागदी पिशव्यांचा प्राधान्याने वापर करावा याविषयी महापालिकेच्या वतीने विविध माध्यमांतून जनजागृती करण्यात येत आहे. यासोबतच प्रतिबंधात्मक प्लास्टिकच्या वापरास खीळ बसावी यादृष्टीने धडक कार्यवाही करण्यात आली.



अशा प्रकारची प्लास्टिक प्रतिबंधात्मक धडक कार्यवाही परिमंडळ– २ उपायुक्त डॉ. श्रीराम पवार यांच्या सूचनेप्रमाणे ऐरोली विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी महेंद्र सप्रे यांनी केली असून ऐरोली कार्यक्षेत्रातील प्रतिबंधात्मक प्लास्टिकचा वापर करणाऱ्या सहा व्यापारांकडून रुपये ३० हजार इतका दंड वसूल करण्यात आलेला आहे. तसेच तीन किलो प्लास्टिक पिशव्या व प्रतिबंधात्मक प्लास्टिक जप्त करण्यात आला आहे.

ऐरोली कार्यक्षेत्रातील सेक्टर ३, सेक्टर १९ व सेक्टर २० येथील दुकानांना अचानक भेट देत तपासणी केली असता सहा दुकानदारांमार्फत प्लास्टिक पिशव्यांचा व प्रतिबंधात्मक प्लास्टिकच्या वापर सुरू असल्याचे आढळले. त्यानुसार ऐरोली विभाग कार्यालयाच्या पथकाने सेक्टर तीन येथील टिपीकल मालवणी, शिव उपहारगृह, श्रीगणेश आहार केंद्र तसेच सेक्टर २० येथील शंकर फास्ट फूड, अंजली स्नॅक्स सेंटर आणि सेक्टर १९ येथील माजीसा डेकोरेटर्स या दुकानांवर कारवाई करीत रुपये पाच हजार दंडात्मक रक्कम वसूल केली.




## पावसात भिजायला वय लागत नाही...!

पावसाच्या सरी मोजण्यात
एक वेगळाच आनंद असतो...
पावसात न भिजताही
सुंदर कविता सुचत जाते...

काळ्या ढगाचा त्याग
पांढऱ्या ढगाला कळत नाही...
विजेच्या लखलखटा शिवाय
पावसाची नांदी सुरू होत नाही...

सृष्टीचा तारणहार कोसळणारा
पाऊस असतो..
हिरवीगार चादर पसरवून
निसर्गाचा चमत्कार दाखवितो.....

पशुपक्षांचा आधारवड
सृष्टीचा ओला ओला प्राणवायू...
तो अमृततुल्य कोसळणारा
पाऊस श्रावण धारा ठरतो....

पावसात भिजायला
वय लागत नाही....
कागदी होड्या सोडायला
बालपण लागत नाही...

नद्यांच्या खळखळटाळा
संगीत लागत नाही...
मृग नक्षत्राच्या पावसाला
आमंत्रण लागत नाही....!



–दिलीप रेडकर,
पनवेल

# रोह्यात स्वच्छतेचा बोजवारा

## काही नागरिक व व्यापाऱ्यांचा कचरा रस्त्यावर


(छाया : महादेव सरसंबे)

**रोहा : प्रतिनिधी**

स्वच्छ रोहा, सुंदर रोहा ही संकल्प राबवण्यासाठी येथील नगर परिषदेच्या वतीने सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. स्वच्छता मोहीम, प्रबोधन व घंटागाडीच्या माध्यमातून दररोज कचरा उचलला जात असतानाही काही व्यापारी व काही नागरिक रस्त्यावरच कचरा फेकत असल्याने स्वच्छ, सुंदर रोहा संकल्पनेला हरताळा फासला जात आहे.

रोहा अष्टमी नगर परिषदेच्या वतीने सातत्याने स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे. स्वच्छता अभियानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या जनजागृती रॅली काढण्यात येत आहेत. ठिकठिकाणी स्वच्छतेचे फलक लावण्यात आले आहेत. भिंती रंगवण्यात आले आहेत. असे असले तरी काही नागरिक व काही व्यापारी रस्त्यावरच कचरा फेकत असल्याचे दिसून येते.

रोहा शहरातील फिरोज टॉकीज ते तहसील कार्यालय मार्ग, सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयाच्या बाजूला असलेले ठिकाण, जिल्हा उपरुग्णालयाच्या समोर यासह अन्य काही ठिकाणी नागरिकांकडून सातत्याने कचरा टाकला जातो. पालिककेकडून हा कचरा उचलला जातो. शहरात कचरा उचलण्यासाठी पालिकेची घंटागाडी आहे. नागरिकांनी व व्यापाऱ्यांनी या गाडीत कचरा टाकणे अपेक्षित असते. सुज्ञ व्यापारी व नागरिक या गाडीत कचरा टाकतात, मात्र काही जण आपल्या दुकानासमोर कचरा टाकत असल्याचे दिसून येते.

**रोहा तहसील कार्यालय ते नवरत्न हॉटेलदरम्यान मुरूड-रोहा-कोलाड मार्ग नागरिकांना वाहतुकीसाठी सुलभ करण्यात येणार आहे. या मार्गावरील अडथळे, पार्किंग व कचरा यासाठी तीन महिन्यांत टप्प्याटप्प्याने नियोजनबद्ध काम करण्यात येणार आहे. यासह ज्या ठिकाणी कचरा पडत आहे त्या ठिकाणी नगर परिषद कर्मचारी तैनात करण्यात येणार आहेत.**

**-पंकज भुसे,**
**प्रभारी मुख्याधिकारी,**
**रोहा नगर परिषद**

सफाई कामगारांच्या वतीने कचरा संकलित केला जातो. रोहा नगर परिषद हद्दीत साडेपाच हजार कुटुंब आहेत. शहरात तालुक्याची मोठी बाजारपेठ आहे. या माध्यमातून मोठ्या प्रमाणात कचरा येत असतो. रोहा अष्टमीतून दररोज ११ टनच्या आसपास कचरा उचलला जातो. हा कचरा पालिकेच्या डम्पिंग ग्राऊंडवर टाकला जातो. या ठिकाणी कचऱ्याचे व्यवस्थापन केले जाते.

रोह्यात शुक्रवारी जिल्हाधिकारी डॉ. योगेश मस्के यांच्या निर्देशानुसार नगर परिषदेमार्फत स्वच्छता व सुलभीकरण अभियान राबविण्यात आले. या वेळी प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवल, तहसीलदार किशोर देशमुख यांच्यासह नगर परिषद व महसूल विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांनी स्वच्छता मोहिमेत सहभागी होऊन नागरिकांना व व्यापाऱ्यांना भेटून जनजागृती केली. यासह काही दुकानासमोर पडलेल्या कचरा हा त्या व्यापाऱ्यांना दाखवत विद्यार्थ्यांनीही प्रबोधन केले.

# पेण कनिष्ठ न्यायालयात ई-फायलिंग सेंटरचे उद्घाटन


(छाया : इजाज मणियार)

**पेण : प्रतिनिधी**

सर्वोच्च न्यायालयाच्या संकल्पनेनुसार न्यायालयांचे कामकाज आता पेपरलेस पद्धतीने होणार आहे. यासाठी जिल्हा अलिबाग न्यायालयात ई-फायलिंग यंत्रणा कार्यान्वित झाली असून महाड पाठोपाठ पेण कनिष्ठ न्यायालयात शुक्रवारी (दि. २५) ई-फायलिंग सेंटरचे उद्घाटन न्यायमूर्ती रुबिना मुजावर यांच्या हस्ते व सह.न्यायमूर्ती प्रितेश देशमुख, जिल्हा ई-फायलींग सेंटर प्रमुख कमीत देशमुख यांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

रायगड जिल्ह्यातील न्यायालयीन कामकाजातील हे तिसरे सेंटर पेण न्यायालयात सुरू झाले आहे. १४ तालुका न्यायालयात ही प्रणाली कार्यन्वित होणार असल्याचे या वेळी सांगण्यात आले असून यासाठी सर्व आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. उच्च न्यायालय व महाराष्ट्र-गोवा वकील संघाच्या पुढाकाराने ही प्रणाली कार्यन्वित करण्यात येत आहे. पहिल्या टप्पात प्रमुख जिल्हा न्यायालयात ई-फायलिंग व फॅसिलिटी केंद्र कार्यान्वित करण्यात आले आहे. यामुळे आता दाखल होणारी नवीन प्रकरणे ऑनलाईन पद्धतीने दाखल करण्यात येत आहे. यासाठी सुविधा केंद्रात दोन संगणक, दोन स्कॅनर प्रिंटर, वेब कॅमेरा, माईक ही उपकरणे बसविण्यात आली आहे. केंद्रात वकिलांच्या मदतीसाठी दोन परिचालक नियुक्त करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास पेण बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. बी.व्ही.म्हात्रे, ॲड. आर.आर. म्हात्रे, ॲड. सुयोग कडू, ज्येष्ठ सदस्य रविकांत म्हात्रे, स्वागत पाटील, वनश्री कामत, सेंटरच्या संचालिका ॲड. विद्या म्हात्रे, टेक्निशियन अँड. कमीत गावंड, संकेत टक्के, मनिष म्हात्रे, आणि बार असोसिएशनचे सर्व वकील मंडळी उपस्थित होते.

# रायगड पोलीस बॅन्ड पथकाची वीरांना मुरूडमध्ये आदरांजली



**मुरूड : प्रतिनिधी**

रायगड पोलीस बॅन्ड पथकाच्या वतीने मुरूड पोलीस ठाणे हद्दीतील बाजारपेठ, काशिद समुद्र, मुरूड समुद्रकिनारी संगीत वाजवून व मातृभूमीला नमन करून वीरांना आदरांजली अर्पण करण्यात आली.

या वेळी पोलीस निरीक्षक निशा जाधव, उपनिरीक्षक अविनाश पाटील, ट्रॅफीक सहाय्यक पोलीस फौजदार संतोष गायकवाड, ट्रॅफीक पोलीस नाईक किशोर बठारे, सहाय्यक फौजदार दिपक राऊळ, पोलीस नाईक परेश म्हात्रे, हवालदार लव गोंधळी, शिपाई धनंजय पाटील, बांगर, होमगार्ड व पोलीस बँड पथक उपस्थित होते.


(छाया : संजय करडे)

देशाबद्दल सर्वांनाच अभिमान आहे. देशाच्या रक्षणासाठी व स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी ज्या शूर सैनिकांनी बलिदान दिले, त्यांच्या बलिदानातूनच देशाला स्वातंत्र्य मिळाले. अशा शूरवीरांचे योगदान माझी माती माझा देश या उपक्रमांतर्गत सर्वांच्या स्मरणात राहील. देशातील प्रत्येक नागरिकाला शूर सैनिकांप्रती अभिमान आहे. देशसेवेसाठी प्राणाची आहुती देणाऱ्या हुतात्मे आपल्या कायम स्मरणात राहणार. सामान्य नागरिक म्हणून आपणही देशासाठी विविध उपक्रमांच्या माध्यमातून सहभाग घेतला पाहिजे. पंतप्रधानांच्या संकल्पनेतून मेरी मिट्टी मेरा देश हे अभियान राबविले जात आहे. या माध्यमातून वीरांना नमन करण्याची आपल्याला संधी मिळाली आहे, असे मत निरीक्षक निशा जाधव यांनी व्यक्त केले.

# अलिबागेत पालिकेतर्फे स्वच्छता मोहीम



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगडचे जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांच्या निर्देशानुसार रस्ता सुलभीकरण व सुशोभीकरण अंतर्गत शुक्रवारी (दि. २५) अलिबाग नगर परिषदेने अलिबाग शहरात स्वच्छता मोहीम राबवली. या मोहिमेत तीन टन कचरा गोळा करण्यात आला.

शहरातील महावीर चौक ते आंबेडकर चौक येथे रस्ता सुलभीकरण, सुशोभीकरण व स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेत नियोजनानुसार प्रत्येकास विभागून दिलेल्या टप्प्यातील प्लॅस्टिक कचरा, गवत काढणे, रस्ते व नालेसफाई, अनधिकृत बॅनर हटविणे, झाडांची छाटणी, डेब्रिज उचलणे आदी कामे करण्यात आली. शहर सुशोभीकरण अंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते महावीर चौक परिसरातील भिंतींवर रंगरंगोटी करण्यात आली. अलिबाग नगर परिषदेमार्फत राबविण्यात येत असलेल्या स्वच्छ भारत अभियान व माझी वसुंधरा अभियान याबाबत नागरिकांना जनजागृती होण्याकरिता अभियानाचे संदेश देणारे होर्डिंग लावण्यात आले व शहर सुशोभिकरणासाठी परिसरातील भिंतीवर रंगरंगोटी करण्यात आली.

रस्त्याला असलेले विजेचे खांब व दुभाजक यांची स्वच्छता रंगरंगोटी करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. ह्या रस्त्यालगत असलेल्या झाडांच्या अनावश्यक फांद्यांची छाटणी करण्यात आली, तसेच पर्यटकांसाठी व नागरिकांसाठी दिशादर्शक फलक, नो पार्किंग फलक लावण्यात आले आहेत. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी यांनी रस्ते सफाई चे काम करत नगरिकांना स्वच्छतेचे महत्त्व व कचरा विलगीकरण कसे करावे ह्याबद्दल माहिती सांगितली. या रस्त्यालगत असलेल्या नाल्याची साफसफाई करण्यात आली. मोहिमेंतर्गत दुकांनाबाहेरील तात्पुरते ठेवलेले साहित्य हटविण्यात आले.

या मोहिमेमध्ये लायन्स क्लब मेंबर, डॉक्टर असोसिएशन मेंबर, लोकप्रतिनिधी, शहरातील नागरिक, विद्यार्थी, शिक्षक, महिला बचत गटातील सदस्य, एसटी आगार कर्मचारी, भाजी विक्रेते, महसूल कर्मचारी, नगरपालिकेचे कर्मचारी, मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते.

# देवळे शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप


(छाया : शैलेश पालकर)

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील राजिप प्राथमिक शाळा देवळे शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना धैर्य सामाजिक संस्थेच्या माध्यमातून शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या वेळी सद्‌गुरू सेवा प्रतिष्ठानच्या माध्यमातून सचित्र बालमित्र पुस्तकांचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमास धैर्य सामाजिक संस्थेचे अध्यक्ष ओंकार उतेकर, सदस्या तृप्ती उतेकर तसेच शिक्षक राजाराम शेलार आणि शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष उमेश केसरकर उपस्थित होते. याबद्दल शाळा व्यवस्थापन समिती आणि शिक्षकवृंद यांनी संस्थेचे आभार मानले.

# दीपक फाउंडेशनतर्फे शेतकरी प्रशिक्षण

**धाटाव : प्रतिनिधी**

दीपक फाऊंडेशन रोहा व दीपक नायट्रेंट कंपनी धाटाव यांच्या वतीने ग्राम जलसंचय प्रकल्पातून लाभ देण्यात आलेल्या शेतकऱ्यांचे रोहा येथे प्रशिक्षण आयोजन करण्यात आले.

शेतकऱ्यांसाठी ग्रामीण भागात राबविण्यात येत असलेला ग्राम जल संचय प्रकल्पांतर्गत ९४ शेतकऱ्यांना आंबा, नारळ, साग, बांबू त्यासह खते असे लाभ देऊन फळबाग वाडी केल्या आहेत तसेच २५ शेतकऱ्यांकडे शेततळी करण्यात आली आहेत. उर्वरित ६५ शेततळेदेखील या वर्षात करण्यात येणार आहे. हा प्रकल्प मोठा शेतकऱ्यासाठी लाभदायक ठरत असून या प्रकल्पांतर्गत तालुक्यातील २० गावातील शेतकऱ्यांना याचा फायदा झाला आहे.

या प्रकल्पातून सर्व शेतकऱ्यांचे फळबाग वाडी याविषयी प्रशिक्षण पार पडले. प्रशिक्षणासाठी कृषी विज्ञान केंद्र किल्ला येथील डॉ. मांजरेकर यांनी मार्गदर्शन केले. या वेळी दीपक फाऊंडेशनचे वरिष्ठ प्रकल्प प्रकल्प समन्वयक अजय आवाडे, प्रकल्प समन्वयक प्रवीण ठोसर, सुपरवायजर रोशन जाधव, प्रतिक मारणे उपस्थित होते व प्रकल्प यशस्वी करण्यासाठी अधिक मेहनत घेत आहेत.



# कर्जतमध्ये आयुर्वेदिक चिकित्सा शिबिराला प्रतिसाद


(छाया : विजय मांडे)

**कर्जत : प्रतिनिधी**

तिरुपती बालाजी मित्र मंडळ सांगवी आयोजित माजी आमदार तुकाराम स्व. सुर्वे प्रतिष्ठान, दादर-मुंबईतील ज्योविस आयुर्वेद, नारी सामाजिक संस्था यांच्या सहकार्याने फार्मसी महाविद्यालयात मोफत आयुर्वेदिक चिकित्सा शिबिराचे आयोजन केले होते. या चिकित्सा शिबिरात २२५ रुग्णांची तपासणी करून त्यांना मोफत औषधे देण्यात आली.

शिबिराचे उद्‌घाटन रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून करण्यात आले. माजी सरपंच मधुकर घारे, ज्योवीस आयुर्वेद हॉस्पिटलच्या डॉ. राज सातपुते, डॉ. ज्योती सातपुते, डॉ. मणिशंकर गुप्ता, आमदार स्वर्गीय तुकाराम सुर्वे प्रतिष्ठानचे मुकेश सुर्वे, तिरुपती बालाजी मित्रमंडळाचे अध्यक्ष जगदीश देशमुख, सरपंच प्रमोद देशमुख, बंडू तुरडे, मनोहर पवार आदी उपस्थित होते.

या शिबिरात डॉ. राज सातपुते, डॉ. ज्योती सातपुते, डॉ. मणीशंकर गुप्ता यांच्यासह पंधरा डॉक्टर आणि दहा आरोग्यसेवक यांनी आरोग्य सेवा दिली. चामखीळ आणि भोवरी हे तत्काळ काढण्यात आले तर पित्त, पाठदुखी, वात, रक्त मोक्षण, आमवात, अग्निकर्म, लकवा आजाराचे रुग्ण यांची चिकित्सा करण्यात आली. बहिरेपणा, सांधे दुखी, कंबर दुखी, गुढघे दुखी आदी व्याधींवर उपचार करण्यात आले. सर्व रुग्णांना मुंबई येथील नारी सामाजिक संघटना यांच्या माध्यमातून सर्व औषधे मोफत देण्यात आली. या वेळी माजी सरपंच परशुराम घारे, सोपान गोरे, बंधू पवार, रवी दाभणे, रंजन दातार, रवींद्र घारे, आयेशा वाडकर, महेश क्षीरसागर, सोमनाथ ठोंबरे, कैलास घारे, ज्ञानेश्वर बागडे, जयेश जाधव, प्रल्हाद चौधरी, किरण पाटील, शर्वाणी जोशी, वैशाली ठाकरे आदी उपस्थित होते.

# स्व. भाऊसाहेब नेने यांच्या स्मृतीदिनानिमित्त व्याख्यान

**पेण : प्रतिनिधी**

पेण एज्युकेशन सोसायटीच्या भाऊसाहेब नेने कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक भाऊसाहेब नेने यांच्या स्मृतीदिनाचे औचित्य साधून शिक्षणावर बोलू काही या विषयावर आधारित व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून चिखलगाव दापोली येथील लोकसाधना विद्यालयाच्या शिक्षिका धनश्री दांडेकर आणि शैलेश खुळे उपस्थित होते, तसेच पेण एज्युकेशन सोसायटीचे आधारस्तंभ ॲड. बापूसाहेब नेने, संस्थेचे अध्यक्ष ॲड. मंगेश नेने, डॉ.नीता कदम, सुधीर जोशी, वसंत आठवले, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदानंद धारप, डॉ.देवीदास बामणे, प्रा. पितळे मॅडम आदींसह प्राध्यापक, शिक्षक आणि विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येत उपस्थित होते.



या वेळी प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. सदानंद धारप यांनी व्याख्यानमालेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करताना त्यांना नवनवीन शैक्षणिक प्रवाहांची ओळख करून देणे, विविध विषयांवर त्यांना विचार प्रवृत्त करुन त्यांना बोलतं करणं आणि त्यांना व्यक्त होण्यासाठी खुलं व्यासपीठ उपलब्ध करून देणे, हा उद्देश असल्याचे सांगितले.

संस्थेचे अध्यक्ष ॲड. मंगेश नेने यांनी आपल्या मनोगतात आगळ्या-वेगळ्या उपक्रमाचे आयोजन केल्याबद्दल प्राचार्य आणि सर्व शिक्षकांचे कौतुक करत ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक व यशस्वी उद्योजक भाऊसाहेब नेने यांची यशोगाथा विद्यार्थ्यांना उलगडून सांगितली. यानंतर महाविद्यालयातील विद्यार्थी साक्षी पांचाळ, भार्गव मेस्त्री, अंजली वारंग, सृष्टी देशपांडे व आशुतोष देव या विद्यार्थ्यांनी शिक्षण व्यवस्थेविषयी आपले विचार मांडले. नंतर लोकसाधना विद्यालयाच्या शिक्षिका धनश्री दांडेकर यांनी लोकसाधना शाळेत राबवले जाणारे विविध कृतीशील उपक्रम, त्यांचा विद्यार्थ्यांना होणारा फायदा याबद्दल माहिती दिली. नंतर लोकसाधना विद्यालयातील यश बोचरे,पायल मोहिते, तनुजा वाकचौरे या विद्यार्थ्यांनी शाळेत राबवले जाणारे विविध उपक्रम, त्यातील मुलांचा सहभाग तसेच शाळातील त्यांचे अनुभव उलगडून सांगितले. नंतर मान्यवरांकडून उपस्थित विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले गेले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.पी.डी.पाटील यांनी तर आभार प्रा. बी.एम. शिकारे यांनी मानले.

## जागतिक अजिंक्यपद बॅडमिंटन स्पर्धा

# प्रणॉयची सेमीफायनलमध्ये धडक

**कोपेनहेगन : वृत्तसंस्था**

भारताच्या एच.एस. प्रणॉयने जबरदस्त झुंज देत डेन्मार्कचा अव्वल मानांकित व्हिक्टर अॅक्सेलसेनवर तीन गेममध्ये १३-२१, २१-१५, २१-१६ असा विजय मिळवून जागतिक अजिंक्यपद बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. त्याला फायनलमध्ये पोहचण्यासाठी जागतिक क्रमवारीत तिसऱ्या क्रमांकावरील कुनलाव्हूट व्हितिदसर्नचा मुकाबला करावा लागणार आहे.



प्रणॉयने शुक्रवारी झालेल्या उपांत्यपूर्व फेरीच्या लढतीत कमालीचा संयम बाळगताना अॅक्सेलसेनचे आव्हान १ तास ८ मिनिटांच्या लढतीनंतर संपुष्टात आणले. व्हिक्टरने पहिल्या गेमला निर्विवाद वर्चस्व राखताना २-२ अशा बरोबरीनंतर ९-२ अशी आघाडी १६-१३ अशी वाढवली. या स्थितीत सलग पाच गुण मिळवत अॅक्सेलसेनने पहिला गेम जिंकला.

दुसऱ्या गेमला कमालीचा चुरस सुरुवातीपासून दिसून आली. रॅलीजच्या बहारदार खेळाने ही गेम ८-८ अशी बरोबरीत होती. तेव्हा प्रणॉयने सलग पाच गुणांची कमाई करताना १३-१० अशी आघाडी घेतली आणि ती १७-१० अशी वाढवत दुसरा गेम सहज जिंकला.

तिसऱ्या निर्णायक गेमला आणखी चुरस अपेक्षित होती, पण प्रणॉयने ४-४ अशा बरोबरीनंतर ७-६ अशी आघाडी सलग पाच गुण मिळवत १२-६ अशी वाढवली आणि मागे वळून बघितले नाही. प्रणॉयने २०-१५ अशा आघाडीवर मिळविलेल्या सहा मॅचपॉइंटपैकी एक गमावला, मात्र पुढच्याच गुणाला प्रणॉयने विजयावर शिक्कामोर्तब केले.

दरम्यान, दुहेरीत भारताच्या दुसऱ्या मानांकित सात्विकसाईराज रंकीरेड्डी-चिराग शेट्टी जोडीचे आव्हान उपांत्यपूर्व फेरीत संपुष्टात आले. डेन्मार्कच्या किम अस्ट्रप-आंद्रेस स्कार्प रॅस्मुसेन जोडीने भारतीय जोडीचा २१-१८, २१-१९ असा पराभव केला.

## आशिया कपसाठी विराट सज्ज

**अलूर : वृत्तसंस्था**



आशिया चषक स्पर्धा ३० ऑगस्टपासून सुरू होत असून टीम इंडिया आशिया कपच्या तयारीत व्यस्त आहे. टीम इंडियाचे प्रशिक्षण शिबिर अलूरमध्ये आयोजित करण्यात आले होते, ज्यामध्ये विराट कोहली, रोहित शर्मा यांच्यासह अनेक वरिष्ठ क्रिकेटपटूंनी हजेरी लावली. सराव शिबिरानंतर कोहलीने इन्स्टाग्रामवर एक फोटो शेअर केला आहे.

विराट कोहलीने इन्स्टाग्राम स्टोरीमध्ये सेल्फी घेतलेला एक फोटो शेअर केला आहे. यामध्ये त्याने कॅप्शनमध्ये लिहिले आहे की, कॅम्पचा सीझन १ संपला आहे. विराट थम्स अपचे चिन्ह दाखवतानाही दिसत आहे.

# आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी महाराष्ट्राचे चार खेळाडू भारतीय कबड्डी संघात

**मुंबई : प्रतिनिधी**

चीनमधील हँगझोऊ येथे होणाऱ्या १९व्या आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या दोन पुरुष व दोन महिला खेळाडूंची भारताच्या कबड्डी संघात निवड जाहीर झाली आहे. ठाण्याचा असलम इनामदार व नाशिकच्या आकाश शिंदे भारतीय पुरुष कबड्डी संघात, तर मुंबईची व भारतीय रेल्वेकडून खेळणारी सोनाली शिंगटे आणि पुण्याची स्नेहल शिंदे भारतीय महिला संघात असणार आहेत.







बुसान येथे नुकत्याच झालेल्या स्पर्धेत भारताने विजेतेपद मिळविले होते. या संघात महाराष्ट्राचा असलम इनामदार हा एकटाच खेळाडू भारतीय संघात होता. आकाश शिंदे हा भारतीय संघाच्या सराव शिबिरात होता, पण त्याची अंतिम संघात निवड झाली नव्हती. या वेळी त्याला संधी मिळाली आहे. हे दोन्ही खेळाडू डाव्या बाजूने चढाई करण्यात माहीर आहेत. बोनस करण्यातही त्यांचा हातखंडा आहे.

दुसरीकडे या अगोदरदेखील महिला भारतीय कबड्डी संघात सोनाली व स्नेहल यांची निवड झाली होती. या दोन्ही चढाईच्या हुकमी खेळाडू आहेत.

चार खेळाडूंच्या निवडीमुळे महाराष्ट्र कबड्डी वर्तुळात आनंदाचे व उत्साहाचे वातावरण पसरले आहे. सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे नवनिर्वाचित सरचिटणीस बाबुराव चांदेरे या निवडीने अत्यंत खुश झाले असून त्यांनी निवड झालेल्या सर्व खेळाडूंचे अभिनंदन केले आहे तसेच दोन्ही संघ सुवर्णपदक मिळवून मायदेशी परत यावेत, अशा सदिच्छा व्यक्त केल्या आहेत.

## शुबमन गिल यो-यो चाचणीत अव्वल



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

विराट कोहली त्याच्या शानदार फलंदाजीशिवाय उत्कृष्ट फिटनेससाठी प्रसिद्ध आहे, पण अलीकडच्या काळात शुबमन गिलने यो-यो चाचणीत विराटपेक्षा जास्त स्कोअर केला आहे. भारतीय संघाचा सलामीवीर असलेल्या शुबमनने यो-यो चाचणीत सर्वाधिक १८.७ गुण मिळवले.

३० ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या आशिया चषकापूर्वी भारतीय संघाच्या खेळाडूंच्या नियमित फिटनेस चाचण्या घेतल्या जात आहेत. युवा शुभमन गिलने १८.७ गुणांसह यो-यो चाचणीत अव्वल स्थान पटकावले आणि १६.५ ची 'कट-ऑफ' पातळी ओलांडली आहे. विराट कोहलीने १७.२ असा स्कोअर केला होता.

यो-यो चाचणी हे खेळाडूंच्या फिटनेसचे मोजमाप करण्याचे प्रमाण आहे. जे खेळाडू सर्वांत तंदुरुस्त असतात ते यो-यो चाचणीमध्ये सर्वाधिक गुण मिळवतात. भारताचा माजी कर्णधार विराट कोहलीने अनेकदा यो-यो टेस्टमध्ये सर्वाधिक स्कोअर केला होता, मात्र या वेळी शुबमन गिलने विराटला मागे टाकले आहे.

## वर्ल्डकपच्या तिकिटांवर चाहत्यांची झुंबड; वेबसाइट क्रॅश

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतात होणाऱ्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेच्या तिकीटांची शुक्रवारी विक्री सुरू झाली, मात्र चाहत्यांनी एकच गर्दी केल्याने अधिकृत वेबसाईट आणि ॲप क्रॅश झाले.

तिकिट विक्रीची प्रक्रिया शुक्रवारी स्थानिक वेळेनुसार रात्री ८ वाजता सुरू झाली आणि चाहत्यांनी 'बुक माय शो' ॲप क्रॅश झाल्याची लगेचच तक्रार केली. अधिकृत वेबसाइट ३५ ते ४० मिनिटे बंद पडल्याने क्रीडा चाहत्यांना तिकीट बुक करण्यात अडचणी आल्या.

क्रॅश झालेली वेबसाईट ३५ ते ४० मिनिटांनी पुन्हा सुरू झाली, पण तोपर्यंत अनेक चाहत्यांचा संयम सुटला होता. काही चाहत्यांनी तक्रार केली की साइट क्रॅश झाली, तर काहींनी सांगितले की खरेदी करताना त्यांचे डिव्हाइस हँग झाले. केवळ भारताच्या सामन्यांचीच नव्हे, तर इतर सामन्यांची तिकिटे खरेदी करणे हेही चाहत्यांसाठी कठीण काम असल्याचे दिसून आले.

# सौरव गांगुलीने विश्वचषकासाठी निवडला संघ

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

एकदिवसीय विश्वचषक स्पर्धा भारतात होणार आहे. विश्वचषकापूर्वी टीम इंडिया आशिया चषक स्पर्धा खेळणार आहे. आशिया चषकासाठी संघ निवड झाल्यानंतर आता विश्वचषक संघाचे चित्रही जवळपास स्पष्ट झाले आहे. त्यामुळे अनेक माजी भारतीय खेळाडू आपापल्या १५ सदस्यीय संघाची निवड करीत आहेत. भारताचा माजी कर्णधार सौरव गांगुलीही यामध्ये सामील झाला आहे.

भारताने आशिया चषक स्पर्धेसाठी १७ सदस्यीय संघ निवडला आहे, तर विश्वचषकासाठी १५ सदस्यीय संघ निवडायचा आहे. मुख्य निवडकर्ता अजित आगरकर यांनीही विश्वचषकाचा संघ जवळपास आशिया कपसारखाच असेल, असे स्पष्ट केले आहे.



भारताने २००३च्या विश्वचषक स्पर्धेत सौरव गांगुलीच्या नेतृत्वाखाली भाग घेतला होता, जिथे टीम इंडिया या स्पर्धेची उपविजेती होती. टीम इंडियाच्या या माजी सलामीवीर फलंदाजाने आपल्या संघातील अनुभवाला प्राधान्य दिले आहे. त्यामुळे सध्यातरी तिलक वर्मासारख्या युवा प्रतिभा असलेल्या खेळाडूची निवड केलेली नाही.

काही महिन्यांपूर्वीपर्यंत संजू सॅमसन विश्वचषक स्पर्धेसाठी संघात आपले स्थान निश्चित करेल असे वाटत होते, परंतु त्याची खराब कामगिरी आणि इशान किशनची चमकदार कामगिरी त्याच्यावर भारी पडताना दिसत आहे. बॅकअप खेळाडू म्हणूनही गांगुलीने त्याची संघात निवड केलेली नाही. यापूर्वी आशिया कपसाठी त्याचा बॅकअप खेळाडू म्हणून समावेश केला होता. स्टार स्पोर्ट्स या क्रिकेट ब्रॉडकास्टर चॅनलवर सौरव गांगुलीने त्याची 'माय वर्ल्ड कप १५' टीम निवडली. या संघात त्याने दुखापतीतून पुनरागमन करणाऱ्या श्रेयस अय्यर आणि केएल राहुलवर विश्वास व्यक्त केला आहे, मात्र, त्याने लेगस्पिनर युजवेंद्र चहलला प्राधान्य दिलेले नाही.

बीसीसीआयच्या माजी अध्यक्षाने बॅकअप खेळाडू म्हणून तीन खेळाडूंना स्थान दिले आहे. एखादा फलंदाज जखमी झाल्यास मी तिलक वर्माला संधी देईन. वेगवान गोलंदाज जखमी झाल्यास प्रसिद्ध कृष्णाला संधी मिळेल, तर फिरकी गोलंदाजाच्या जागी युजवेंद्र चहल स्टँडबाय खेळाडू असेल, असे तो म्हणाला.

### असा आहे संघ

रोहित शर्मा (कर्णधार), शुबमन गिल, इशान किशन, विराट कोहली, श्रेयस अय्यर, केएल राहुल, सूर्यकुमार यादव, हार्दिक पांड्या, रवींद्र जडेजा, अक्षर पटेल, कुलदीप यादव, जसप्रीत बुमराह, मोहम्मद शमी, मोहम्मद शमी, मोहम्मद सिराज आणि शार्दुल ठाकूर.

## टीम इंडियाच्या आंतरराष्ट्रीय सामन्यांचे हक्क आता आयडीएफसी बँकेकडे

### बीसीसीआय होणार अधिक मालामाल!




**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) उत्पन्नात मोठी वाढ होणार आहे. खासगी क्षेत्रातील बँक आयडीएफसीने भारतीय संघाच्या देशांतर्गत आंतरराष्ट्रीय सामन्यांचे हक्क विकत घेतले आहेत. यासाठी आता बीसीसीआयला प्रत्येक आंतरराष्ट्रीय सामन्यासाठी आयडीएफसीकडून ४.२ कोटी रुपये मिळणार आहेत. यापूर्वी गेल्या वेळी जेव्हा विजेतेपदाचे हक्क मास्टरकार्डकडे होते, तेव्हा बीसीसीआयला प्रत्येक सामन्यासाठी ३.८ कोटी रुपये मिळत होते. त्यात आता ४० लाखांची वाढ झाली आहे.

वृत्तानुसार टायटल राइट्स मिळवण्यासाठी बीसीसीआयने लिलावासाठी २.४ कोटी रुपये आधारभूत किंमत निश्चित केली होती. आयडीएफसीने आता पुढील तीन वर्षांसाठी विजेतेपदाचे हक्क सुरक्षित केले आहेत, ज्याची सुरुवात पुढील महिन्यात ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तीन सामन्यांच्या वनडे मालिकेने होईल. ऑगस्ट २०२६पर्यंत ५६ सामन्यांसाठी हा करार करण्यात आला आहे. यातून बीसीसीआयला सुमारे एक हजार कोटी रुपयांची कमाई अपेक्षित आहे.

आयडीएफसीव्यतिरिक्त स्पोर्ट्स ब्रॉडकास्टर कंपनी सोनी स्पोर्ट्सनेही देशांतर्गत सामन्यांचे शीर्षक हक्क मिळविण्यासाठी भाग घेतला होता. याशिवाय या लिलावात अन्य कोणतीही कंपनी सहभागी झाली नाही. आता भारतीय संघाच्या घरच्या सामन्यांच्या प्रसारणाचे अधिकार कोणत्या कंपनीला मिळतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## मादागास्करमध्ये क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटन समारंभात चेंगराचेंगरी

# १२ ठार, ८० जण जखमी

**बारिया : वृत्तसंस्था**

आफ्रिकेतील देश मादागास्करमध्ये आयोजित इंडियन ओशन आयलँड गेम्स (आयओआयजी)च्या उद्घाटन समारंभात चेंगराचेंगरी झाली. यामध्ये १२ लोकांचा मृत्यू झाला असून ८० जण जखमी झाले आहेत.

परदेशी प्रसारमाध्यमांनी दिलेल्या माहितीनुसार मादागास्करमधील बारिया स्टेडियमवर शुक्रवारी इंडियन ओशन आयलँड गेम्सचा उद्घाटन सोहळा पार पडला. या कार्यक्रमासाठी सुमारे ५० हजार प्रेक्षक आले होते. यादरम्यान स्टेडियमच्या प्रवेशद्वारावर चेंगराचेंगरी होऊन १२ जणांचा मृत्यू झाला, तर सुमारे ८० लोक जखमी झाले असून त्यापैकी ११ जणांची प्रकृती गंभीर आहे.

मादागास्करचे राष्ट्राध्यक्ष अँड्री राजोएलिना यांनी मृतांबद्दल शोक व्यक्त केला आहे. राष्ट्राध्यक्षांनी ही घटना दुर्दैवी असल्याचे म्हटले आहे. शोक व्यक्त करताना त्यांनी शांतता बाळगण्याचे आवाहनही जनतेला केले आहे.

सुमारे ४१ हजार लोकांची क्षमता असलेल्या या स्टेडियममध्ये यापूर्वीही अशाच घटना घडल्या आहेत. याआधी २०१९मध्ये एका कॉन्सर्टदरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत १५ जणांचा मृत्यू झाला होता.

# हिथ स्ट्रिकचा फोटो व्हायरल



**हरारे : वृत्तसंस्था**

झिम्बाब्वेचा माजी कर्णधार आणि दिग्गज अष्टपैलू क्रिकेटपटू हिथ स्ट्रिक याचे वयाच्या ४९ व्या वर्षी कर्करोगाने निधन झाल्याचे वृत्त काही दिवसांपूर्वी पसरले होते. अनेक क्रिकेटपटूंनी श्रद्धांजलीही वाहिली होती, पण स्ट्रिक जिवंत असून त्याचा एक फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे, परंतु त्यात स्ट्रिकची अवस्था पाहून चाहते भावूक झाले आहेत.

हिथ स्ट्रिकचे निधन झाल्याचे वृत्त झिम्बाब्वे संघातील सहकारी हेन्री ओलोंगा याने ट्वीट करून दिले होते. त्याने नंतर जुने ट्वीट डिलीट करून स्ट्रिक जिवंत असल्याचा दावा केला आहे. ओलोंगाने नव्या ट्विटमध्ये लिहिले की, हिथ स्ट्रिकच्या निधनाची बातमी खूप वेगाने पसरली. मी आताच त्याच्याशी बोललो. तिसऱ्या पंचांनी त्याला परत बोलावलेय. तो खूप मनमोकळा माणूस आहे आणि तो जिवंत आहे.

झिम्बाब्वेचा माजी कर्णधार असलेल्या हिथ स्ट्रिकने बोर्डासोबत वाद झाल्यामुळे वयाच्या केवळ ३१व्या वर्षी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती स्वीकारली होती. स्ट्रिकने झिम्बाब्वेकडून ६५ कसोटी आणि १८९ सामने खेळले होते. या दोन्ही प्रकारांत मिळून त्याने ४९३३ धावा आणि ४५५ बळी टिपले आहेत. २००५मध्ये हिथ स्ट्रिकने प्रशिक्षणाच्या क्षेत्रात पाऊल ठेवले होते. त्यानंतर त्याने बांगलादेश आणि झिम्बाब्वेचा प्रशिक्षक म्हणून काम पाहिले तसेच आयपीएलमध्ये कोलकाता नाईटरायडर्सचा प्रशिक्षक म्हणूनही त्याने काम पाहिले होते.

# आशिया चषक क्रिकेट स्पर्धेतील सामने मोबाईलवर पाहता येणार मोफत

**मुंबई : प्रतिनिधी**

आशिया चषक क्रिकेट स्पर्धा ३० ऑगस्ट ते १७ सप्टेंबर या कालावधीत पाकिस्तान आणि श्रीलंकेत खेळवली जाणार आहे. आशिया कपचे सर्व सामने मोबाईलवर मोफत पाहता येतील. अलीकडेच डिस्ने+हॉटस्टारने सर्व यूजरकर्त्यांसाठी आशिया कप आणि विश्वचषक स्पर्धेचे सर्व सामने विनामूल्य प्रसारित करण्याची घोषणा केली.

आशिया चषक स्पर्धेत भारत, पाकिस्तान, श्रीलंका, बांगलादेश, अफगाणिस्तान आणि नेपाळ हे सह संघ सहभागी होत आहेत. ही स्पर्धा प्रथमच पाकिस्तान आणि श्रीलंका या दोन देशांमध्ये खेळवली जाणार आहे, ज्यामध्ये पाकिस्तानमध्ये चार सामने आणि श्रीलंकेत नऊ सामने खेळले जातील. या स्पर्धेत अंतिम फेरीसह एकूण १३ सामने रंगणार आहेत.



आशिया चषकातील पहिला सामना ३० सप्टेंबर रोजी मुलतान येथे पाकिस्तान आणि नेपाळ यांच्यात होणार आहे. भारत आशिया चषक मोहिमेची सुरुवात २ सप्टेंबर रोजी कँडी येथे पाकिस्तानविरुद्ध करणार आहे.

स्टार स्पोर्ट्सने भारत आणि श्रीलंका, अफगाणिस्तान, नेपाळ, बांगलादेश, मालदीव आणि भूतान या शेजारील देशांमधील आशिया कप सामन्यांचे प्रसारण हक्क विकत घेतले आहेत. सर्व सामन्यांचे थेट प्रक्षेपण डिस्ने+हॉटस्टार प्लॅटफॉर्मवर ॲप आणि वेबसाइटवरून उपलब्ध असेल. सामने स्टार स्पोर्ट्स नेटवर्क चॅनेलवर प्रसारित केले जातील. स्टार स्पोर्ट्स १, स्टार स्पोर्ट्स १ एचडी, स्टार स्पोर्ट्स १ हिंदी, स्टार स्पोर्ट्स १ हिंदी एचडी, स्टार स्पोर्ट्स सिलेक्ट १, स्टार स्पोर्ट्स सिलेक्ट १ एचडी, स्टार स्पोर्ट्स २, स्टार स्पोर्ट्स २ एचडी. तसेच प्रादेशिक भाषांमध्येदेखील स्टार स्पोर्ट्स तमिळ, मराठी, गुजराती आणि बंगाली इथे पाहू शकता.

## उरणमध्ये आज फुटबॉल स्पर्धा

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातून उत्तमोत्तम व गुणवंत खेळाडू तयार व्हावेत आणि हे खेळाडू राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्तरावर चमकावेत या दृष्टीकोनातून तसेच खेळाडूंना उत्तम व्यासपीठ मिळवून देण्याच्या अनुषंगाने सत्यम इंटरनॅशनल या संस्थेतर्फे रविवारी (दि. २७) रोजी सकाळी १० ते संध्याकाळी ६ या वेळत उरण शहरातील स्वातंत्र्यवीर सावरकर मैदान येथे तालुका स्तरीय फुटबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

जास्तीत जास्त रसिक प्रेक्षकांनी, नागरिकांनी या स्पर्धेचा आस्वाद घेऊन खेळांडूचा आनंद द्विगुणीत करावा, असे आवाहन सत्यम इंटरनॅशनल या संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

# भारतासाठी विराट कोहली चौथ्या क्रमांकावर योग्य फलंदाज -डिव्हिलियर्स

**जोहान्सबर्ग : वृत्तसंस्था**

एकदिवसीय वर्ल्डकप आणि आशिया कप २०२३च्या तयारीत असलेल्या भारतीय क्रिकेट संघासमोरील सर्वांत मोठी समस्या चौथ्या क्रमांकाची आहे. अलीकडच्या काळात श्रेयस अय्यर दुखापतीमुळे संघातून बाहेर पडत असताना टीम इंडियाकडे चौथ्या क्रमांकावर एकही फलंदाज नसल्याची चर्चा जोर धरू लागली होती.

चौथ्या क्रमांकावर खेळणारा फलंदाज हा मधल्या फळीतील महत्त्वाचा दुवा असतो, जो परिस्थितीनुसार डाव हाताळतो आणि गरज पडेल तेव्हा झटपट धावा करण्याचे कामही करतो. यादरम्यान दक्षिण आफ्रिकेचा दिग्गज एबी डिव्हिलियर्सने विराट कोहलीबाबत मोठे वक्तव्य केले.



श्रीलंकेतील कँडी येथे २ सप्टेंबर रोजी आशिया कप स्पर्धेतील पहिल्या सामन्यात भारताचा सामना पाकिस्तानशी होणार आहे. त्याआधी दक्षिण आफ्रिकेचा माजी कर्णधार एबी डिव्हिलियर्स त्याच्या यूट्यूब चॅनेलवर बोलताना म्हणाला की, भारताचा सुपरस्टार फलंदाज विराट कोहली हा आशिया कप आणि वर्ल्डकप स्पर्धेसाठी चौथा क्रमांक योग्य आहे. तो डाव हाताळू शकतो आणि मधल्या फळीत कोणत्याही प्रकारची भूमिका बजावू शकतो.

डिव्हिलियर्स पुढे म्हणाला की, विराटला चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करायला आवडेल की नाही याची मला खात्री नाही, पण जर संघाला त्याची गरज आहे मग त्याला ते करावे लागेल.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या माजी कर्णधाराने आशिया कप जिंकण्यासाठी भारत आणि पाकिस्तान या दोन आवडत्या संघांची निवड केली. भारताने सर्वाधिक सात वेळा ही स्पर्धा जिंकली आहे, तर पाकिस्तानने दोन वेळा आशिया कप जिंकला आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com